



# पारनेर दर्शन






वर्ष ४ अंक १४१, शुक्रवार ३१ जुलै २०२६ | संपादक : देविदास आबूज | कार्यकारी संपादक : विजय वाघमारे | RNI No.MAHMAR/2015/61493 | किंमत : ३ रुपये


# अहिल्यानगरच्या विकासाचा अजेंडा दिल्लीत

**खासदार नीलेश लंके यांनी संरक्षण मंत्र्यांकडे मांडले तीन महत्त्वाचे प्रस्ताव | संरक्षण मंत्री राजनाथ सिंह यांची भेट | अहिल्यानगर किल्ला विकास, व्हिआरडीईचे संरक्षण आणि सैन्य हद्दीलगतच्या गावांच्या ना हरकत प्रश्नावर तीन महत्त्वाची निवेदने सादर**

**नवी दिल्ली : प्रतिनिधी**

**अहिल्यानगरच्या ऐतिहासिक, संरक्षणविषयक आणि नागरिकांच्या दैनंदिन जीवनाशी निगडित प्रश्नांना केंद्र सरकारच्या पातळीवर गती मिळावी, या उद्देशाने खासदार नीलेश लंके यांनी गुरुवारी नवी दिल्लीत केंद्रीय संरक्षण मंत्री राजनाथ सिंह यांची भेट घेतली. या भेटीत त्यांनी संरक्षण मंत्रालयाशी संबंधित तीन अत्यंत महत्त्वाच्या विषयांवर सविस्तर चर्चा करून स्वतंत्र निवेदने सादर केली. यात स्वदेश दर्शन २.० योजनेअंतर्गत मंजूर झालेल्या अहिल्यानगर किल्ला विकास प्रकल्पाची रखडलेली कामे तातडीने सुरू करणे, अहिल्यानगर येथील व्हिआरडीई कोणत्याही परिस्थितीत स्थलांतरित न करणे आणि नगर तालुक्यातील सैन्य हद्दीलगतच्या गावांमध्ये बांधकामासाठी आवश्यक असलेल्या ना हरकत प्रमाण पत्रासंदर्भातील गोंधळ दूर करण्यासाठी स्पष्ट धोरण जाहीर करण्याची मागणी करण्यात आली.**

लंके यांनी सांगितले की, हे तिन्ही विषय केवळ अहिल्यानगरपुरते मर्यादित नसून राज्याच्या पर्यटन विकास, देशाच्या संरक्षण संशोधन व्यवस्था आणि हजारो



नागरिकांच्या मूलभूत हक्कांशी संबंधित आहेत. त्यामुळे संरक्षण मंत्रालयाने या प्रश्नांवर वैयक्तिक लक्ष घालून तातडीने निर्णय घेण्याची गरज असल्याचे त्यांनी स्पष्ट केले.

## २४.९९ कोटींचा अहिल्यानगर किल्ला विकास प्रकल्प रखडला

पहिल्या निवेदनात खासदार लंके यांनी स्वदेश दर्शन २.० योजनेअंतर्गत २४.९९ कोटी रुपयांच्या निधीतून मंजूर झालेल्या अहिल्यानगर किल्ला विकास प्रकल्पाची माहिती संरक्षण मंत्र्यांना दिली. केंद्र सरकारच्या पर्यटन मंत्रालयाने या ऐतिहासिक प्रकल्पाला मंजुरी दिल्यानंतरही भारतीय सैन्य आणि जिल्हा प्रशासन यांच्यातील सामंजस्य करार अंतिम न झाल्याने प्रत्यक्ष कामाला सुरुवात होऊ शकलेली नाही, असे त्यांनी निदर्शनास आणून दिले. अहिल्यानगर किल्ला हा महाराष्ट्राच्या इतिहासातील महत्त्वाचा वारसा असून वीरांगना चांदबीबीच्या पराक्रमाचा साक्षीदार आहे. भारताचे पहिले पंतप्रधान पंडित जवाहरलाल नेहरू यांनी कारावासात असताना याच किल्ल्यात डिस्कव्हरी ऑफ इंडिया हा ऐतिहासिक ग्रंथ लिहिला होता. त्यामुळे या किल्ल्याला राष्ट्रीय वारसा म्हणून विशेष महत्त्व असल्याचे लंके यांनी नमूद केले. किल्ल्याच्या तटबंदी, बुरुज, खंदक, पर्यटक सुविधा केंद्र, माहिती केंद्र, स्वच्छता सुविधा, पार्किंग, सौर प्रकाश व्यवस्था, दिशादर्शक फलक आणि परिसर सुशोभीकरणाची कामे या प्रकल्पातून होणार आहेत. आगामी सिंहस्थ कुंभ २०२७ पूर्वी ही कामे पूर्ण झाल्यास शिर्डी, शनि शिंगणापूर, सिद्धटेक, देवगड, चांदबीबी महाल आणि कळसूबाई यांसारख्या पर्यटनस्थळांशी जोडून मोठे पर्यटन परिपथ विकसित करता येईल, असे त्यांनी नमूद केले.त्यासाठी भारतीय सैन्य, पर्यटन मंत्रालय, महाराष्ट्र शासन आणि जिल्हा प्रशासन यांच्यात उच्चस्तरीय समन्वय साधून प्रकल्पाची वेळबद्ध अंमलबजावणी करण्याचे निर्देश देण्याची मागणी त्यांनी संरक्षण मंत्र्यांकडे केली.

## व्हिआरडीई स्थलांतराच्या चर्चेमुळे चिंता

दुसऱ्या निवेदनात खासदार लंके यांनी अहिल्यानगरमधील देशातील महत्त्वाच्या संरक्षण संशोधन संस्थांपैकी एक असलेल्या व्हिआरडीई संदर्भातील संभाव्य स्थलांतराच्या चर्चेबाबत तीव्र चिंता व्यक्त केली. हरेगाव मळा परिसरात नवीन संरक्षण संशोधन आणि उद्योग प्रकल्प प्रस्तावित असल्याच्या पार्श्वभूमीवर भविष्यात व्हिआरडीई अथवा इतर संरक्षण संस्थांचे कामकाज टप्प्याटप्प्याने अन्यत्र हलविण्यात येईल, अशी भीती स्थानिक नागरिक आणि तज्ज्ञांकडून व्यक्त केली जात असल्याचे त्यांनी सांगितले. अहिल्यानगरमध्ये आर्मर्ड कॉर्प्स सेंटर अँड स्कूल, मेकॅनाइज्ड इन्फंट्री सेंटर अँड स्कूल, व्हिआरडीई आणि वाहन गुणवत्ता आश्वासन नियंत्रकालय यांसारख्या देशासाठी महत्त्वाच्या संस्था कार्यरत आहेत. स्वदेशी संरक्षण तंत्रज्ञान, लष्करी वाहनांची निर्मिती, चाचण्या आणि संशोधनासाठी विकसित झालेली ही परिसंस्था देशात दुर्मीळ असल्याचे त्यांनी अधोरेखित केले. आत्मनिर्भर भारत आणि मेक इन इंडिया अभियानाला बळ देण्यात व्हिआरडीईचे मोठे योगदान असल्याचे सांगत त्यांनी कोणत्याही परिस्थितीत या संस्थेचे स्थलांतर करू नये, अशी ठाम मागणी केली. नवीन संरक्षण संशोधन किंवा उत्पादन प्रकल्प उभारायचे असल्यास ते विद्यमान संरक्षण व्यवस्थेच्या विस्ताराच्या स्वरूपात अहिल्यानगरमध्येच उभारावेत. तसेच अहिल्यानगरला नॅशनल डिफेन्स रिसर्च, टेस्टिंग अँड इनोव्हेशन हब म्हणून विकसित करण्यासाठी केंद्र सरकारने विशेष धोरण जाहीर करावे, अशीही मागणी त्यांनी केली. हरेगाव मळा येथील जमिनीवर अनेक शेतकऱ्यांचे दावे आणि जमीन हक्कांचे प्रश्न प्रलंबित असल्याने ते निकाली काढल्याशिवाय कोणताही अंतिम निर्णय घेऊ नये, असेही त्यांनी स्पष्ट केले.

## केंद्राच्या हस्तक्षेपाची अपेक्षा

भेटीदरम्यान खासदार नीलेश लंके यांनी अहिल्यानगरचा ऐतिहासिक वारसा जपणे, संरक्षण संशोधन क्षेत्र अधिक सक्षम करणे आणि नागरिकांच्या दैनंदिन अडचणी दूर करणे ही काळाची गरज असल्याचे संरक्षण मंत्री राजनाथ सिंह यांच्या निदर्शनास आणून दिले. संरक्षण मंत्रालयाने या तिन्ही विषयांवर सकारात्मक निर्णय घेतल्यास पर्यटन, संरक्षण क्षेत्र, रोजगारनिर्मिती आणि स्थानिक विकासाला मोठी चालना मिळेल, असा विश्वास त्यांनी व्यक्त केला.

## सैन्य हद्दीलगतच्या नागरिकांना दिलासा द्या

तिसऱ्या निवेदनात नगर तालुक्यातील वाकोडी, दरेवाडी, निबोडी तसेच सैन्य परिसरालगतच्या गावांतील नागरिकांना बांधकामासाठी येणाऱ्या अडचणींचा मुद्दा उपस्थित करण्यात आला. २०११ मधील संरक्षण मंत्रालयाच्या परिपत्रकानुसार काही ठिकाणी ना हरकत प्रमाणपत्र अनिवार्य मानली जात आहे, तर २०१६ मधील सुधारित परिपत्रकात विशिष्ट अटींवर ना हरकत प्रमाणपत्राची गरज नसल्याचे नमूद करण्यात आले आहे. या दोन परिपत्रकांतील विसंगतीमुळे स्थानिक प्रशासन आणि सैन्य अधिकाऱ्यांमध्ये संभ्रम निर्माण झाला असून नागरिकांच्या वैध बांधकामांवर आक्षेप घेतले जात आहेत. यामुळे शेतकऱ्यांच्या शेतीकामात, बांधकाम साहित्याच्या वाहतुकीत आणि स्थानिक विकासकामांमध्ये अडथळे निर्माण होत असल्याचे लंके यांनी संरक्षण मंत्र्यांच्या निदर्शनास आणून दिले. या पार्श्वभूमीवर संरक्षण मंत्रालयाने तातडीने अद्ययावत आणि स्पष्ट मार्गदर्शक सूचना जारी कराव्यात, नागरिक, स्थानिक प्रशासन आणि सैन्य यांच्यात समन्वयासाठी कायमस्वरूपी यंत्रणा उभारावी तसेच वैध मालकीच्या जमिनीवरील बांधकाम आणि नागरिकांच्या संपत्ती हक्कांचे संरक्षण सुनिश्चित करावे, अशी मागणी त्यांनी केली.

# सिस्पे घोटाळ्यात मोठे यश!

**इंटरपोलमार्फत फिजीमध्ये मुख्य आरोपी राहुल काळोखेला अटक , खासदार नीलेश लंके यांच्या सातत्यपूर्ण पाठपुराव्यामुळे आंतरराष्ट्रीय स्तरावर कारवाई , हजारो पीडितांसाठी न्यायाच्या दिशेने महत्त्वाचा टप्पा**

सुपा : प्रतिनिधी

राज्यातील बहुचर्चित सिस्पे घोटाळ्याप्रकरणी हजारो गुंतवणूकदारांसाठी दिलासादायक आणि आशादायी घडामोड समोर आली आहे. या प्रकरणातील फरार मुख्य आरोपींपैकी एक तसेच कथित मास्टरमाइंड अकाउंटंट राहुल शामराव काळोखे याला इंटरपोलच्या माध्यमातून फिजी येथे अटक करण्यात आल्याची माहिती समोर आली आहे. या कारवाईमुळे अनेक वर्षांपासून न्यायाच्या प्रतीक्षेत असलेल्या पीडितांमध्ये



नव्याने आशा निर्माण झाली असून, घोटाळ्यातील इतर आरोपींवरही लवकरच कारवाई होईल, असा विश्वास व्यक्त केला जात आहे.

या महत्त्वपूर्ण कारवाईसाठी खासदार नीलेश लंके यांनी विविध केंद्रीय व राज्यस्तरीय यंत्रणांकडे सातत्याने पाठपुरावा केला होता. केंद्रीय गृहमंत्री अमित शाह यांचीही खा. लंके यांनी भेट घेऊन या प्रश्नाकडे लक्ष वेधले होते. त्यांच्या प्रयत्नांमुळे भारतीय तपास यंत्रणांनी आंतरराष्ट्रीय स्तरावर प्रभावी समन्वय साधत आरोपीचा माग काढण्यात यश मिळविल्याचे सांगितले जात आहे.

## आंतरराष्ट्रीय सहकार्यामुळे आरोपीच्या मुसक्या आवळल्या

सिस्पे घोटाळा उघडकीस आल्यानंतर अनेक गुंतवणूकदारांनी आपली मोठ्या प्रमाणात आर्थिक फसवणूक झाल्याच्या तक्रारी दाखल केल्या होत्या. तपास सुरू असताना प्रमुख आरोपी राहुल काळोखे हा देशाबाहेर फरार झाल्याचे निष्पन्न झाले. त्यानंतर त्याचा शोध घेण्यासाठी भारतीय यंत्रणांनी इंटरपोलची मदत घेतली. अखेर फिजीमध्ये त्याचा ठावठिकाणा लागल्यानंतर तेथील संबंधित यंत्रणांच्या सहकार्याने त्याला ताब्यात घेण्यात आले. या अटकेमुळे आता त्याला भारतात आणण्यासाठी आवश्यक कायदेशीर प्रक्रिया वेगाने पार पडण्याची शक्यता व्यक्त केली जात आहे. त्यामुळे घोटाळ्याशी संबंधित आर्थिक व्यवहार, पुरावे आणि इतर आरोपींबाबतही तपासाला अधिक गती मिळण्याची अपेक्षा आहे.

## विविध यंत्रणांचा समन्वय ठरला निर्णायक

या कारवाईत भारतीय तपास यंत्रणा, महाराष्ट्र पोलीस, पोलीस अधीक्षक कार्यालय (अहिल्यानगर), केंद्रीय अन्वेषण विभाग (सीबीआय), भारत सरकारचे गृह मंत्रालय, परराष्ट्र मंत्रालय तसेच इंटरपोल यांनी परस्पर समन्वयाने काम केले. विविध विभागांमध्ये झालेल्या सातत्यपूर्ण पत्रव्यवहार, तांत्रिक माहितीची देवाणघेवाण आणि कायदेशीर प्रक्रियेमुळे ही कारवाई यशस्वी झाल्याचे सांगितले जात आहे.

## खासदार लंके यांचा सातत्यपूर्ण पाठपुरावा

सिस्पे घोटाळ्यातील पीडितांना न्याय मिळावा, आरोपींना अटक व्हावी आणि तपासाला गती मिळावी यासाठी खासदार नीलेश लंके यांनी वारंवार संबंधित यंत्रणांशी संपर्क साधत प्रकरणाचा पाठपुरावा केला. दिल्लीपासून राज्यातील वरिष्ठ अधिकाऱ्यांपर्यंत त्यांनी हा विषय सातत्याने लावून धरला होता. त्यातूनच या प्रकरणाला आवश्यक गती मिळाल्याचे बोलले जात आहे.

## तपासाला मिळणार नवी दिशा

मुख्य आरोपी अटकेत आल्याने घोटाळ्यातील पैशांचा मागोवा, संबंधित व्यवहार, परदेशातील आर्थिक देवाणघेवाण आणि इतर संशयितांची भूमिका याबाबत तपास अधिक व्यापक होण्याची शक्यता आहे. यामुळे या प्रकरणातील इतर आरोपींवरही कारवाईची प्रक्रिया वेगाने पुढे सरकेल, असा अंदाज व्यक्त केला जात आहे.

## हजारो पीडितांमध्ये समाधानाचे वातावरण

या कथित घोटाळ्यात अनेकांनी आयुष्यभराची जमा-पूंजी गमावल्याचा दावा केला आहे. अनेक कुटुंबांवर आर्थिक संकट कोसळले असून, काहींना मोठे कर्जही सहन करावे लागले. त्यामुळे मुख्य आरोपीच्या अटकेची बातमी समोर आल्यानंतर पीडितांमध्ये समाधानाचे वातावरण निर्माण झाले आहे. आता न्याय मिळेल अशी भावना अनेकांनी व्यक्त केली आहे.

## न्यायाच्या लढ्यातील महत्त्वाचा टप्पा

राहुल काळोखे याची अटक ही केवळ एका आरोपीच्या ताब्यापुरती मर्यादित नसून, हजारो पीडितांना न्याय मिळवून देण्याच्या प्रक्रियेतील एक महत्त्वाचा टप्पा मानला जात आहे. संबंधित यंत्रणा उर्वरित आरोपींचा शोध घेऊन त्यांच्याविरोधातही कठोर कारवाई करतील, अशी अपेक्षा व्यक्त होत आहे. या कारवाईमुळे अनेक वर्षांपासून न्यायासाठी संघर्ष करणाऱ्या पीडितांच्या आशा पुन्हा पल्लवित झाल्या असून, संपूर्ण प्रकरणातील सत्य बाहेर येण्याचा मार्ग अधिक मोकळा झाल्याची भावना व्यक्त होत आहे.

# लाडकी बहीण योजनेला नकार

**जळगावातील दोन हजार महिलांचा निर्णय**

**जळगाव : प्रतिनिधी**

**मुख्यमंत्री माझी लाडकी बहीण योजना पुन्हा एकदा चर्चेत आली आहे. जळगाव जिल्ह्यातील तब्बल दोन हजार महिलांनी या योजनेचा लाभ स्वेच्छेने नाकारत शासनाकडे अर्ज सादर केला आहे. शासनाच्या एक लाभार्थी-एकच योजना या धोरणामुळे हा निर्णय घेतल्याचे समोर आले आहे.**



आर्थिकदृष्ट्या दुर्बल कुटुंबांतील महिलांसाठी महायुती सरकारने विधानसभा निवडणुकीपूर्वी मुख्यमंत्री माझी लाडकी बहीण योजना सुरू केली होती. या योजनेअंतर्गत पात्र महिलांच्या बँक खात्यात दरमहा १,५०० रुपये जमा केले जातात. निवडणुकीच्या प्रचारादरम्यान सरकार पुन्हा सत्तेत आल्यास ही रक्कम २,१०० रुपये करण्यात येईल, असे आश्वासनही देण्यात आले होते. मात्र सरकारला जवळपास दोन वर्षे पूर्ण होत आली तरी या अनुदानात कोणतीही वाढ झालेली नाही. त्यामुळे २,१०० रुपये कधी मिळणार, याकडे राज्यातील लाखो लाभार्थी महिलांचे लक्ष लागले आहे.

उर्वरीत पान ३ वर

# वासुंदे चौकात पिकअपचा भीषण अपघात

**एकाचा मृत्यू, सहा जण जखमी | धोकादायक वळणावर चालकाचा ताबा सुटल्याचा प्राथमिक अंदाज | मध्यरात्रीच्या दुर्घटनेने परिसरात हळहळ**

**टाकळी ढोकेश्वर : प्रतिनिधी**

**तालुक्यातील टाकळी ढोकेश्वर येथील वासुंदे चौकात बुधवारी (दि. २९) रात्री सुमारे ११ वाजण्याच्या सुमारास बोलेरो पिकअप वाहनाचा भीषण अपघात होऊन एका युवकाचा जागीच मृत्यू झाला, तर सहा जण गंभीर जखमी झाले. धोकादायक वळणावर वाहनावरील नियंत्रण सुटल्याने हा अपघात झाल्याचा प्राथमिक अंदाज व्यक्त करण्यात येत आहे.**



मिळालेल्या माहितीनुसार, बोलेरो पिकअप (क्र. एमएच १५ जेडब्ल्यू २८०४) वाहनातून काही कामगार प्रवास करीत होते. टाकळी ढोकेश्वर येथील वासुंदे चौकातील धोकादायक वळणावर वाहनाचा ताबा सुटल्याने पिकअपचा भीषण अपघात झाला. अपघाताचा जोर इतका मोठा होता की वाहनातील प्रवासी गंभीर जखमी झाले.

अपघातानंतर मोठा आवाज झाल्याने परिसरातील नागरिकांनी तातडीने घटनास्थळी धाव घेतली. जखमींना वाहनातून बाहेर काढून रुग्णवाहिकेच्या मदतीने उपचारासाठी रुग्णालयात दाखल करण्यात आले. घटनेची माहिती मिळताच पोलीस व आपत्कालीन यंत्रणांनी घटनास्थळी धाव घेत मदतकार्य सुरू केले.

उर्वरीत पान ३ वर

# अल्पवयीन मुलीवरील अत्याचारप्रकरणी आरोपीला अटक

**| पारनेर पोलिसांची तत्पर कारवाई | न्यायालयाकडून तीन दिवसांची पोलीस कोठडी**

**पारनेर : प्रतिनिधी**

**१३ वर्षे ६ महिने वयाच्या अल्पवयीन मुलीवर गेल्या दोन वर्षांपासून लैंगिक अत्याचार केल्याप्रकरणी आरोपीला गुन्हा दाखल झाल्यानंतर अवघ्या एका तासाच्या आत अटक करण्यात पारनेर पोलिसांना यश आले आहे. या प्रकरणातील आरोपी विठ्ठल मुरलीधर फरतारे (वय ५१, मूळ रा. मोहोज देवडे, ता. पाथर्डी, सध्या रा. लोणी हवेली रोड, पारनेर) याला न्यायालयाने तीन दिवसांची पोलीस कोठडी सुनावली आहे.**




पोलिसांनी दिलेल्या माहितीनुसार, २९ जुलै रोजी पीडित मुलीच्या पालकांनी पारनेर पोलीस ठाण्यात तक्रार दाखल केली. आरोपीने गेल्या दोन वर्षांपासून अल्पवयीन मुलीवर बळजबरीने लैंगिक अत्याचार केल्याचा आरोप तक्रारीत करण्यात आला आहे. तसेच, ही बाब कोणालाही


उर्वरीत पान ३ वर

# भारतीय क्रिकेटमधील अजिंक्यपर्व संपलं !

**अजिंक्य रहाणेने केली निवृत्तीची घोषणा**

**मुंबई : प्रतिनिधी**

**शैलीदार आणि तंत्रशुद्ध फलंदाजी तसेच कुशल नेतृत्वाच्या जोरावर आंतरराष्ट्रीय क्रिकेटमध्ये आपली वेगळी ओळख निर्माण करणारा भारताचा क्रिकेटपटू अजिंक्य रहाणे याने आंतरराष्ट्रीय क्रिकेटमधून निवृत्तीची घोषणा केली आहे. २०११ साली आंतरराष्ट्रीय क्रिकेटमध्ये पदार्पण करणाऱ्या अजिंक्य रहाणेने अल्पावधीतच मधल्या फळीतील भरवशाचा फलंदाज म्हणून भारतीय क्रिकेटमध्ये आपले स्थान पक्के केले होते. तसेच कर्णधार म्हणूनही आपल्या नेतृत्वाची छाप पाडली होती. अजिंक्य रहाणेच्या नेतृत्वाखाली २०२०-२१ च्या ऑस्ट्रेलिया दौऱ्यात भारतीय संघाने ऐतिहासिक कसोटी मालिका विजय मिळवला होता**



**अजिंक्य रहाणेची आंतरराष्ट्रीय कारकीर्द**

२०११ साली झालेल्या भारतीय संघाच्या इंग्लंड दौऱ्यातून अजिंक्य रहाणे याने एकदिवसीय आणि टी-२० क्रिकेटमध्ये पदार्पण केले होते. त्यावेळी टी-२० क्रिकेटमध्ये पदार्पणातच अर्धशतकी खेळी करत अजिंक्य रहाणेने आपल्या कौशल्याची चुणूक दाखवली होती. पुढे २०१३ साली ऑस्ट्रेलियाविरुद्धच्या कसोटी मालिकेतून अजिंक्य रहाणेने कसोटी क्रिकेटमध्ये पदार्पण केले होते. दरम्यान, २०२३ साली वेस्ट इंडिज दौऱ्यातील दुसरा कसोटी सामना हा त्याच्या आंतरराष्ट्रीय कारकिर्दीतील शेवटचा सामना ठरला होता.

अजिंक्य रहाणेने ८५

उर्वरीत पान ३ वर

# तपासणीपूर्वीच काळी फिल्म हटवली !

**तहसीलदारांच्या वाहनावरील काळ्या काचा अखेर काढल्या | आरटीओ तपासणीत वाहन नियमांनुसार असल्याचा अहवाल | मनसेच्या तक्रारीनंतर प्रशासनाची तातडीने हालचाल**

पारनेर : प्रतिनिधी

पारनेर तहसीलदार यांच्या शासकीय वाहनावरील काळ्या काचांच्या वादाला अखेर नवे वळण मिळाले आहे. महाराष्ट्र नवनिर्माण सेनेच्या तक्रारीनंतर प्रादेशिक परिवहन कार्यालयाने संबंधित वाहनाची तपासणी करण्याचे आदेश दिले. त्यानुसार सहायक मोटार वाहन निरीक्षकांनी प्रत्यक्ष वाहनाची पाहणी करून उपप्रादेशिक परिवहन अधिकाऱ्यांकडे अहवाल सादर केला. या अहवालात वाहनावर कोणत्याही प्रकारच्या नियमबाह्य काळ्या काचा आढळून आल्या नसल्याचे नमूद करण्यात आले आहे. मात्र, तपासणी अधिकारी घटनास्थळी पोहोचण्यापूर्वीच वाहनावरील काळी फिल्म काढण्यात आल्याचा दावा मनसेने केला असून, दोषींवर कारवाई व्हावी, या मागणीवर पक्ष ठाम आहे.



## वादावर पडदा की नवे प्रश्न?

आरटीओच्या तपासणी अहवालानंतर या प्रकरणावरील तत्काळ प्रशासकीय प्रक्रिया पूर्ण झाली असली, तरी मनसेने केलेल्या दाव्यामुळे या वादाला नवे परिमाण मिळाले आहे. एकीकडे तपासणीवेळी वाहन नियमांनुसार असल्याचे प्रशासनाचे म्हणणे आहे, तर दुसरीकडे तपासणीपूर्वीच काळी फिल्म हटविण्यात आल्याचा मनसेचा आरोप कायम आहे. यामुळे केवळ वाहनावरील काळ्या काचांचा मुद्दाच नव्हे, तर तक्रारीनंतर प्रशासनाची झालेली हालचाल आणि त्यानंतर घडलेल्या घटनाक्रमाचीही चर्चा सुरू झाली आहे. या प्रकरणात पुढे आणखी काही पुरावे किंवा अधिकृत भूमिका समोर येते का, याकडे आता पारनेर तालुक्याचे लक्ष लागले आहे.

## मनसेच्या तक्रारीनंतर प्रशासनाची हालचाल

मनसेचे पारनेर तालुकाध्यक्ष अविनाश पवार यांनी २७ जुलै रोजी प्रादेशिक परिवहन कार्यालय, अहिल्यानगर येथे अधिकृत तक्रार दाखल केली होती. पारनेर तहसीलदार यांच्या वापरातील एमएच-१६-डीजी-८७१९ या शासकीय वाहनावर बेकायदेशीरपणे काळ्या काचा लावण्यात आल्याचा आरोप त्यांनी केला होता. तक्रारीसोबत संबंधित वाहनाची छायाचित्रेही पुराव्यादाखल जोडण्यात आली होती. तसेच संबंधित वाहनावर तात्काळ दंडात्मक कारवाई करून काळ्या काचा काढण्याची मागणी करण्यात आली होती. अन्यथा आरटीओ कार्यालयासमोर तीव्र आंदोलन छेडण्याचा इशाराही मनसेने दिला होता. या भूमिकेमुळे प्रशासकीय वर्तुळात या प्रकरणाची मोठी चर्चा सुरू झाली होती.

## आरटीओकडून तपासणीचे आदेश

मनसेच्या निवेदनाची दखल घेत उपप्रादेशिक परवहन अधिकारी माधव सूर्यवंशी यांनी पारनेर तालुक्यातील सहायक मोटार वाहन निरीक्षकांना संबंधित वाहनाची प्रत्यक्ष तपासणी करण्याचे आदेश दिले. आदेशानुसार वाहनाची पाहणी करून नियमांचे उल्लंघन आढळल्यास मोटार वाहन कायद्यानुसार कारवाई करावी आणि त्याबाबतचा अहवाल सादर करावा, असे निर्देश देण्यात आले होते. त्यानुसार संबंधित अधिकाऱ्यांनी वाहनाची तपासणी केली. तपासणीनंतर सादर केलेल्या अहवालात वाहनावर कोणत्याही प्रकारच्या काळ्या काचा किंवा नियमबाह्य फिल्म आढळून आली नसल्याचा निष्कर्ष नोंदविण्यात आला.

## तपासणीपूर्वीच फिल्म काढली

दरम्यान, तपासणी अहवालावर मनसेने प्रश्नचिन्ह उपस्थित केले आहे. सहायक मोटार वाहन निरीक्षक वाहन तपासणीसाठी पोहोचण्यापूर्वीच शासकीय वाहनावरील काळी फिल्म काढण्यात आल्याचा दावा तालुकाध्यक्ष अविनाश पवार यांनी केला आहे. सुरुवातीला जोडलेल्या छायाचित्रांमध्ये वाहनावर काळ्या काचा स्पष्ट दिसत होत्या, असा दावा करत संबंधितांवर कारवाई झालीच पाहिजे, अशी भूमिका त्यांनी कायम ठेवली आहे. मनसेच्या मते, तक्रारीनंतर प्रशासनाने तत्काळ हालचाल केल्याने संबंधित वाहनावरील काळ्या काचा हटविण्यात आल्या. त्यामुळे सध्याच्या तपासणीत वाहन नियमांनुसार आढळले असले तरी पूर्वी नियमांचे उल्लंघन झाले होते, असा पक्षाचा दावा आहे.

## आरटीओचे स्पष्टीकरण

उपप्रादेशिक परिवहन अधिकारी माधव सूर्यवंशी यांनी या प्रकरणी स्पष्ट केले की, आरटीओच्या वायुवेग पथकाकडून नियमितपणे वाहनांची तपासणी केली जाते. मनसेने दाखल केलेल्या अर्जानंतर संबंधित वाहनाची प्रत्यक्ष पडताळणी करण्यात आली. तपासणीवेळी वाहनावर काळ्या काचा आढळून आल्या नसल्याने नियमभंग झाल्याचे निष्पन्न झाले नाही. त्यामुळे या प्रकरणावरून कोणतेही आंदोलन करू नये, असे आवाहनही त्यांनी केले आहे.

# तंत्रमंत्र

विज्ञानयुगातील बितंबातम्या

# ना नोकरीचा ताण, ना पैशांची चिंता !

## एलोन मस्कचा दावा : म्हणाला, रोबोट गरिबी दूर करतील !



**भविष्यात तुम्हाला काम करण्याची गरज पडणार नाही. नोकरीचा ताण किंवा पैशाची चिंता राहणार नाही ? तुम्हाला हे मजेदार वाटेल, परंतु जगातील सर्वात श्रीमंत व्यक्ती एलोन मस्क यांनी सर्वांच्या भविष्याबद्दलचा हा दावा केला आहे. त्यांनी म्हटले, की भविष्यात रोबोट मानवी कामाचा ताबा घेतील आणि गरिबी पूर्णपणे दूर करतील. त्यांनी म्हटले, की भविष्यात मानव फक्त विश्रांती घेतील आणि रोबोट सर्व काही करतील. आता प्रश्न असा उद्भवतो : या दाव्यांचे कारण काय होते आणि त्यात किती सत्यता होती ? चला या दाव्यांचे वास्तव जाणून घेऊया...**

### रोबोट गरिबी दूर करतील का ?

एलोन मस्क यांनी अलीकडेच गुंतवणूकदारांच्या बैठकीत दावा केला की पुढील १० ते २० वर्षांत रोबोटचे युग येईल. मानव करत असलेली सर्व कामे रोबोट करतील. मस्क यांच्या मते, त्यांची कंपनी टेस्लाचा ह्युमनॉइड रोबोट 'ऑप्टिमस' लवकरच कारखान्यांमध्ये काम करण्यास सुरुवात करेल. यानंतर, तो हळूहळू सामान्य लोकांच्या घरात पोहोचेल, बहुतेक लोकांच्या दैनंदिन जीवनातील कामे ताब्यात घेईल. मस्क यांचा असा विश्वास आहे की जेव्हा रोबोट सर्व कामे करतील तेव्हा गोष्टी खूप स्वस्त होतील आणि प्रत्येक जणाला त्या परवडतील. हा बदल इतका मोठा असेल की संपूर्ण जागतिक अर्थव्यवस्थेत बदल घडवून आणेल.

### रोबोट गरिबी कशी दूर करतील ?

तुम्हाला कदाचित प्रश्न पडेल की रोबोट गरिबी कशी दूर करतील ? मस्क यांनी यासाठी स्वतःचा एक वेगळा फॉर्म्युला दिला आहे. ते म्हणाले, की भविष्यात जेव्हा रोबोट उत्पादनाचे काम करतील, तेव्हा त्यांना पैसे देण्याची गरज भासणार नाही. यामुळे वस्तू स्वस्त होतील आणि प्रत्येक जण त्या खरेदी करू शकतील. उदाहरणार्थ, जर आज टी-शर्टची किंमत ५०० रुपये असेल, तर भविष्यात त्यामागे मजुरी नसल्याने त्याची किंमत ५० रुपये असू शकते. त्याचप्रमाणे, अन्न, घर आणि कार हे सर्व खूप स्वस्त होतील. रोबोट २४ तास काम करतील, उत्पादन वाढवतील आणि किंमती कमी करतील. त्यामुळे गरिबी आपोआप नष्ट होईल.



### स्वप्नाबद्दल तज्ज्ञांचे काय मत आहे ?

एलोन मस्क यांच्या दाव्यांवर तज्ज्ञांमध्ये मतभेद आहेत. काहींचा असा विश्वास आहे की मस्क यांचे दावे खरे असू शकतात. कारण तंत्रज्ञान वेगाने प्रगती करत आहे. तथापि, काही तज्ज्ञ त्यांना फक्त पोकळ बडबड मानतात. तज्ज्ञांचा असा युक्तिवाद आहे की जर रोबोट सर्व काही करत असतील तर नोकऱ्या शिल्लक राहणार नाहीत. यामुळे गरिबी दूर होणार नाही तर ती वाढेल. शिवाय, रोबोटचे उत्पादन आणि देखभाल महाग होईल. अशा परिस्थितीत कंपन्या वस्तू स्वस्त का करतील ? तथापि, काही तज्ज्ञ असाही दावा करतात की जरी मस्क यांच्या म्हणण्याप्रमाणे सर्व काही घडले तरी गरिबी दूर होण्यासाठी १०० वर्षांहून अधिक काळ लागेल.

### रोबोट आणि मानवांमधील संबंध कसा असेल ?

चला क्षणभर गृहीत धरूया की मस्क यांचे दावे खरे आहेत तर भविष्यातील जग पूर्णपणे वेगळे असेल. सकाळी रोबोट चहा आणि नाश्ता पोहोचवतील आणि मुलांना शाळेत पाठवण्यापासून ते घर स्वच्छ करण्यापर्यंत सर्व काही रोबोट करतील. लोकांना ऑफिसला जाण्याचीही गरज भासणार नाही, कारण बहुतेक ऑफिसची कामे रोबोट करतील. लोकांकडे भरपूर मोकळा वेळ असेल आणि ते त्यांच्या छंदांवर काम करू शकतील. अशा युगात मानव अत्यंत आळशी होण्याची शक्यता आहे. शिवाय जर रोबोटवर इतके अवलंबून राहिले आणि कधीही बिघाड झाला तर जीवन स्वतःच थांबेल. तथापि, भविष्यात काय होईल हे फक्त वेळच सांगेल.



# हाय-टेक चिप असलेला पासपोर्ट कसा मिळेल?



**संपूर्ण प्रक्रिया जाणून घ्या...**

**जर तुम्ही २८ मे २०२५ रोजी किंवा त्यानंतर नवीन पासपोर्ट बनवला असेल किंवा त्याचे नूतनीकरण केले असेल, तर तुम्हाला मिळणारा पासपोर्ट ई-पासपोर्ट असेल. तो जुन्या पासपोर्टसारखाच दिसेल, परंतु त्याच्या कव्हरवर अशोक स्तंभाखाली एक चिप असेल. या चिपमध्ये पासपोर्ट धारकाची सर्व बायोमेट्रिक माहिती असेल. यामुळे प्रश्न निर्माण होतो: तुम्ही ई-पासपोर्टसाठी अर्ज कसा करू शकता ? चला संपूर्ण प्रक्रिया सविस्तरपणे समजून घेऊया...**

### काय लक्षात ठेवावे ?

- पासपोर्टसाठी अर्ज करताना, सर्व तपशील भरण्यापूर्वी दोन ते तीन वेळा उलटतपासणी करा.
- तुम्हाला आधार कार्ड, पॅन कार्ड, बँक पासबुक, वीज/पाणी/गॅस बिल इत्यादी कागदपत्रांची आवश्यकता असू शकते. म्हणून, अर्ज करताना ही कागदपत्रे तुमच्यासोबत ठेवा.
- तुमची जन्मतारीख सिद्ध करण्यासाठी, तुम्हाला जन्म प्रमाणपत्र, आधार कार्ड, मतदार ओळखपत्र, ड्रायव्हिंग लायसन्स, मॅट्रिक्युलेशन सर्टिफिकेट इत्यादी कागदपत्रांची आवश्यकता असू शकते.
- तुमच्या सर्व मूळ कागदपत्रांसह तुमच्या अपॉइंटमेंटसाठी पीएसके येथे या.




### ई-पासपोर्ट म्हणजे काय ?

- ई-पासपोर्ट ही सामान्य पासपोर्टची प्रगत आवृत्ती आहे, ज्यामध्ये इलेक्ट्रॉनिक चिप असते. ही चिप पासपोर्ट धारकाचा बायोमेट्रिक डेटा, फोटो, फिंगरप्रिंट आणि वैयक्तिक माहिती संग्रहित करते. या पासपोर्टमध्ये इतर अनेक प्रगत सुरक्षा वैशिष्ट्ये आहेत, ज्यामुळे बनावट पासपोर्ट तयार करणे जवळजवळ अशक्य होते. ई-पासपोर्ट इमिग्रेशन प्रक्रियेला देखील गती देते.
- स्टेप १ : प्रथम, पासपोर्ट सेवा ऑनलाइन पोर्टलवर जा आणि स्वतःची नोंदणी करा.
- स्टेप २ : नोंदणी केल्यानंतर Apply for Fresh Passport / Re-issue of Passport वर क्लिक करा. लक्षात ठेवा की जर तुम्ही पहिल्यांदाच पासपोर्टसाठी अर्ज करत असाल तर Fresh Issuance पर्याय निवडा.
- स्टेप ३ : आता आवश्यक माहिती योग्यरित्या भरा आणि सबमिट करा. सर्व माहिती आधीपासून क्रॉस-चेक करा. कोणतीही चुकीची माहिती प्रविष्ट केल्याने पासपोर्ट मिळविण्यात अडचणी येऊ शकतात.
- स्टेप ४ : फॉर्म सबमिट केल्यानंतर View Saved/ Submitted Applications सेक्शनमध्ये जाऊन Pay and Schedule Appointment वर क्लिक करा. येथे ऑनलाइन पेमेंट करणे महत्वाचे आहे; त्यानंतरच तुमची अपॉइंटमेंट PSK, POPSK किंवा पोस्ट ऑफिसमध्ये बुक केली जाईल.
- स्टेप ५ : अर्ज सबमिट केल्यानंतर आणि पेमेंट पूर्ण केल्यानंतर, तुम्हाला तुमचा ARN किंवा अपॉइंटमेंट नंबर असलेली पावती मिळेल. याव्यतिरिक्त, तुम्हाला तुमच्या नोंदणीकृत क्रमांकावर SMS द्वारे अपॉइंटमेंट तपशील प्राप्त होतील. हे सुरक्षित ठेवा, कारण तुम्हाला ते पासपोर्ट कार्यालयात सादर करावे लागतील.
- स्टेप ६ : तुमच्या अपॉइंटमेंट तारखेला मूळ कागदपत्रांसह पासपोर्ट सेवा केंद्र (PSK) किंवा प्रादेशिक पासपोर्ट कार्यालय (RPO) ला भेट द्या आणि प्रत्यक्ष पडताळणी प्रक्रिया पूर्ण करा. जर तुम्ही पत्ता पडताळणी पर्याय निवडला असेल, तर तुमच्या कागदपत्रांची पडताळणी करण्यासाठी पासपोर्ट व्हॅन तुमच्या पत्त्यावर येईल. कृपया लक्षात ठेवा की पासपोर्ट व्हॅन सेवा सध्या काही ठिकाणीच उपलब्ध आहे.
- स्टेप ७ : यानंतर, तुमची पोलिस पडताळणी होईल आणि तुमचा ई-पासपोर्ट १५ ते २० दिवसांत तुमच्या पत्त्यावर पोहोचेल.

# छोटे उपकरण बनले धोकादायक शस्त्र !

## लाइट चमकवून प्लेन क्रॅश करण्याची क्षमता, काही देशांनी घातलीये बंदी

**तंत्रज्ञानाच्या युगात बहुतेक उपकरणे लोकांना मदत करण्यासाठी आणि त्यांचे काम सोपे करण्यासाठी तयार केली जातात. तथापि, काही उपकरणे सुरुवातीला चांगल्यासाठी बनवलेली, नंतर धोकादायकपणे वापरली जाऊ लागली. १९६० च्या दशकात असे एक उपकरण विकसित केले गेले, जे वर्गातील शिक्षकांपासून ते ऑफिसमध्ये सादरीकरण देणाऱ्यांपर्यंत सर्वांसाठी उपयुक्त होते. परंतु हळूहळू, ते अधिक शक्तिशाली बनले. आता, हेच लहान उपकरण इतके तीव्र प्रकाश उत्सर्जित करू शकते की जर ते थेट डोळ्यांत पडले तर ते एखाद्या व्यक्तीला त्वरित अंध बनवू शकते. ते इतके धोकादायक आहे की जर जमिनीवरून आकाशात चमकवले आणि विमान उडविणाऱ्या पायलटच्या डोळ्यांत गेले तर विमान नियंत्रणाबाहेर जाऊन क्रॅश होऊ शकते. या उपकरणाला 'लेसर पॉइंटर' म्हणतात.**



### लेसर पॉइंटरचा इतिहास

लेसर पॉइंटरची कहाणी १९६० मध्ये सुरू होते, जेव्हा अमेरिकन शास्त्रज्ञ थियोडोर मेमन यांनी जगातील पहिला लेसर तयार केला. हा एक रुबी लेसर होता, जो खूप मोठा आणि महाग होता. त्यावेळी, कोणीही कल्पना केली नव्हती की लेसर कधी खिशात वापरता येतील असे पेन बनतील. १९८० च्या दशकाच्या सुरुवातीला, स्वस्त लाल लेसर डायोड विकसित केले गेले. खरे लेसर पॉइंटर प्रथम १९८० च्या दशकाच्या उत्तरार्धात आणि १९९० च्या दशकाच्या सुरुवातीला अमेरिका आणि जपानमधील कंपन्यांनी बनवले होते. सुरुवातीला, हे महाग होते आणि फक्त व्यावसायिक वापरत असत. परंतु १९९५ ते २००० दरम्यान, चीनमध्ये खूप स्वस्त लेसर पॉइंटर तयार होऊ लागले. त्यानंतर, पेनासारखे लेसर पॉइंटर फक्त ५-१० डॉलरमध्ये उपलब्ध झाले.



- ५ मिलीवॅटपेक्षा जास्त क्षमतेचे लेसर पॉइंटर धोकादायक : काही वर्षांपूर्वीपर्यंत लेसर पॉइंटर खूप उपयुक्त होते. जेव्हा पॉवरपॉइंट स्लाइड्स उपलब्ध झाल्या, तेव्हा शिक्षक आणि सादरकर्ते दूर बसलेल्या लोकांना गोष्टी समजावून सांगण्यासाठी त्यांचा वापर करत असत. ते लहान पेनांसारखे दिसत होते आणि लाल किंवा हिरव्या दिव्याची पातळ रेषा सोडत होते. पण हळूहळू, ते खूप शक्तिशाली झाले आणि लोक त्यांचा गैरवापर करू लागले. लेसर लाईट खूप तेजस्वी आणि केंद्रित आहे. उच्च-शक्तीचे लेसर, म्हणजेच ५ मिलीवॅटपेक्षा जास्त क्षमतेचे लेसर, एखाद्या व्यक्तीला अंध बनवू शकतात.
- या देशांची लेसर पॉइंटर्सवर बंदी : काही देशांनी वाढत्या धोक्यांमुळे लेसर पॉइंटर्सवर बंदीदेखील घातली आहे. अमेरिकेत, ५ मिलीवॅटपेक्षा जास्त क्षमतेचे लेसर पॉइंटर्स विकणे बेकायदेशीर आहे. ब्रिटनमध्ये, १ मिलीवॅटपेक्षा जास्त क्षमतेचे लेसर पॉइंटर्सवरदेखील पूर्णपणे बंदी आहेत. कॅनडा, ऑस्ट्रेलिया आणि न्यूझीलंडमध्येही कठोर कायदे आहेत. सार्वजनिक ठिकाणी विनाकारण लेसर पॉइंटर्स ठेवणे हा गुन्हा आहे, ज्यासाठी दंड आणि तुरुंगवासाची शिक्षा आहे.
- भारतात काही निर्बंध : भारतात अद्याप देशभरात लेसर पॉइंटर्सवर बंदी नाही, परंतु काही भागात ते प्रतिबंधित आहेत. विशेषतः, विमानतळापासून १०-२० किलोमीटर अंतरावर लेसर वापरल्याने शिक्षा होऊ शकते. अशा प्रकरणांमध्ये पोलीस आणि न्यायालये कठोर कारवाई करत आहेत.

# मोबाइलवर OTP च्या जागी येईल ePNV

**Google ने दिल्लीत सुरक्षित आणि विश्वासार्ह AI कार्यक्रम आयोजित केला होता. कंपनीने कृत्रिम बुद्धिमत्ता (AI) अधिक सुरक्षित करण्यासाठी आणि लोकांना फसवणुकीपासून वाचवण्यासाठी अपडेट्सवर चर्चा केली. Google विशेषतः मुले, युवा वर्ग आणि वृद्धांवर लक्ष केंद्रित करत आहे. Google Pixel डिव्हाइसमध्ये आता कॉल दरम्यान रिअल-टाइम स्कॅम डिटेक्शनची सुविधा असेल. हे वैशिष्ट्य जेमिनी नॅनोवर आधारित आहे. या वैशिष्ट्याअंतर्गत, संशयास्पद पॅटर्नचे एनालिस केले जाते आणि स्कॅमचा संशय आला तर लगेचच वापरकर्त्याला अलर्ट पाठवला जातो. ऑडिओ रेकॉर्ड केला जात नाही किंवा डेटा गुगलसोबत शेअर केला जात नाही. चला सर्व अपडेट्सबद्दल सविस्तर जाणून घेऊया...**

### एआय सांगेल, मेसेज फसवणूक करणारा आहे?

- रिअल-टाइम स्कॅम डिटेक्शन : जेमिनी नॅनोद्वारे पिक्सेल स्मार्टफोनवर रिअल-टाइम स्कॅन डिटेक्शन फिचर उपलब्ध आहे. हे फिचर तुमच्या फोनवर थेट स्कॅम ओळखते. हे फिचर रेकॉर्ड करत नाही किंवा ट्रान्सक्रिप्ट तयार करत नाही. तुमचा कोणताही डेटा गुगलला पाठवला जात नाही. मनोरंजक म्हणजे, हे वैशिष्ट्य डीफॉल्टनुसार बंद आहे, म्हणजे तुम्हाला ते स्वतः सक्षम करावे लागेल.
- एआय-निर्मित सामग्री ओळखणे सोपे : गुगल प्ले प्रोटेक्टने आजपर्यंत ११५ दशलक्षाहून अधिक वेळा माहितीचा गैरवापर करणाऱ्या अॅप्सना स्थापित होण्यापासून रोखले आहे. सिंथआयडी ही गुगलची स्वतःची एआय वॉटरमार्किंग आणि डिटेक्शन टेक्नॉलॉजी आहे. ती आता शैक्षणिक संस्था, संशोधक आणि अनेक मीडिया प्रकाशकांना उपलब्ध करून दिली जात आहे. याचा अर्थ एआय-निर्मित कंटेंट ओळखणे सोपे होईल. भारतात एआयचा वाढता वापर आणि त्याच्याशी संबंधित सुरक्षा जोखीम लक्षात घेऊन हे केले जात आहे. भारतीय वापरकर्ते एआय सुरक्षितपणे आणि विश्वासार्हपणे वापरू शकतील याची खात्री करण्याचे गुगलचे उद्दिष्ट आहे
- ओटीपीची जागा घेईल ईपीएनव्ही : गुगल एन्हांस्ड फोन नंबर व्हेरिफिकेशन (ईपीएनव्ही) नावाच्या नवीन अँड्रॉइड-आधारित सुरक्षा प्रोटोकॉलवर देखील काम करत आहे. हे विद्यमान एसएमएस ओटीपी सिस्टमची जागा घेईल. गुगल म्हणते की ही एक सुरक्षित, सिम-आधारित पडताळणी आहे जी ओटीपीशी संबंधित जोखीम दूर करते.

## शॉर्ट न्यूज

### लाडक्या बहिणींचा हप्ता खात्यात जमा

**मुंबई :** मुख्यमंत्री माझी लाडकी बहीण योजनेचा जुलै महिन्याचा हप्ता पात्र महिलांच्या खात्यात जमा होण्यास सुरुवात झाली आहे. उर्वरित लाभार्थ्यांच्या खात्यातही टप्प्याटप्प्याने रक्कम जमा केली जाणार आहे. बँक खात्याची माहिती अद्ययावत ठेवण्याचे आवाहन प्रशासनाने केले आहे.

### मुसळधार पावसाने जनजीवन विस्कळीत

**पुणे :** शहरासह जिल्ह्यात जोरदार पावसामुळे अनेक सखल भागांत पाणी साचले. काही ठिकाणी वाहतुकीवर परिणाम झाला असून नागरिकांना सतर्क राहण्याचा सल्ला देण्यात आला आहे. महापालिकेची आपत्कालीन यंत्रणा सज्ज ठेवण्यात आली आहे.

### सोयाबीन खरेदीची तयारी अंतिम टप्प्यात

**नागपूर :** खरीप हंगामातील सोयाबीन खरेदीसाठी शासनाने तयारीला वेग दिला आहे. खरेदी केंद्रांची उभारणी आणि शेतकरी नोंदणी प्रक्रिया सुरू असून लवकरच अंतिम यादी जाहीर होणार आहे. यामुळे शेतकऱ्यांना दिलासा मिळण्याची अपेक्षा आहे.

### जलसंधारणाच्या कामांना वेग

**अहिल्यानगर :** जिल्ह्यातील पाणीटंचाईग्रस्त भागांत जलसंधारण आणि पाणीपुरवठ्याच्या विविध कामांना गती देण्यात आली आहे. संबंधित विभागांना कामांचा नियमित आढावा घेण्याच्या सूचना देण्यात आल्या आहेत. ग्रामपंचायतींनाही नियोजनबद्ध काम करण्याचे निर्देश देण्यात आले आहेत.

### कांद्याच्या दरात सुधारणा

**नाशिक :** कृषी उत्पन्न बाजार समितीत कांद्याच्या बाजारभावात काही प्रमाणात वाढ झाली आहे. दर्जेदार मालाला व्यापाऱ्यांकडून चांगली मागणी मिळत असून शेतकऱ्यांमध्ये समाधानाचे वातावरण आहे. पुढील काही दिवस दर स्थिर राहण्याची शक्यता व्यक्त केली जात आहे.

# गुरुपौर्णिमेनिमित्त तालुकास्तरीय 'गुरुरत्न पुरस्कार' वितरण उत्साहात

**विविध क्षेत्रातील मान्यवरांचा गौरव । पीएसआय शिवाजीराव मुंढे यांचे विद्यार्थ्यांना प्रेरणादायी मार्गदर्शन**



**शिरूर : प्रतिनिधी**

**रामलिंग महिला उन्नती बहुउद्देशीय सामाजिक संस्था यांच्या वतीने गुरुपौर्णिमेनिमित्त दरवर्षीप्रमाणे यंदाही तालुकास्तरीय 'गुरुरत्न पुरस्कार' वितरण सोहळा बापूरावनगर येथील श्लोक अकॅडमीमध्ये उत्साहपूर्ण वातावरणात पार पडला. विविध क्षेत्रात उल्लेखनीय कार्य करणाऱ्या मान्यवरांचा यावेळी सन्मान करण्यात आला.**

कार्यक्रमाची सुरुवात श्री गणेशमूर्तीचे पूजन तसेच पर्यावरण संवर्धनाचा संदेश देत वृक्षाला हार अर्पण करून करण्यात आली. त्यानंतर उपस्थित मान्यवरांचे पुष्पगुच्छ देऊन स्वागत करण्यात आले.

यावेळी पंचायत समितीच्या सभापती सौ. स्वातीताई घावटे, नगरसेविका डॉ. सुनीता पोटे, संदीप कुटे, ह.भ.प. गंगाराम महाराज कौठाळे आणि पत्रकार तेजस फडके यांनी मनोगत व्यक्त करत गुरुंचे समाजजीवनातील स्थान, संस्कारांची परंपरा आणि शिक्षकांच्या योगदानाचे महत्त्व अधोरेखित केले.

प्रमुख पाहुणे पीएसआय शिवाजीराव मुंढे यांनी श्लोक पोलिस अकॅडमीतील सुमारे ३०० विद्यार्थ्यांना स्पर्धा परीक्षा, शिस्त, कर्तव्यनिष्ठा, व्यक्तिमत्त्व विकास आणि यशस्वी जीवनासाठी आवश्यक असलेल्या गुणांविषयी प्रेरणादायी मार्गदर्शन केले. त्यांच्या मार्गदर्शनाला विद्यार्थ्यांनी उत्स्फूर्त प्रतिसाद दिला.

यावेळी पंचायत समिती सभापती सौ. स्वातीताई घावटे, पीएसआय शिवाजीराव मुंढे, नगरसेविका डॉ. सुनीता पोटे, स्वप्नाली जामदार, ग्रामपंचायत सदस्य केशव शिंदे, सामाजिक कार्यकर्त्या मीनाताई गवारे, गीता आढाव, शितल शर्मा आणि प्रियंका केदारी यांच्या हस्ते गुरुरत्न पुरस्कार प्रदान करण्यात आले.

यावर्षी अविनाश सुमन लक्ष्मण परांडे (अध्यक्ष, श्लोक पोलिस अकॅडमी), ह.भ.प. गंगाराम महाराज कौठाळे (अध्यक्ष, महर्षी संस्थान), विभावरी नितीन देव (महिला दक्षता समिती सदस्या), किसन बहिरू खोडदे (शिक्षण विस्तार अधिकारी) आणि डॉ. अखिलेश राजुरकर (श्री गणेशा हॉस्पिटल) यांना ट्रॉफी, पुष्पगुच्छ आणि सन्मानचिन्ह देऊन गौरविण्यात आले.

कार्यक्रमाचे प्रास्ताविक संस्थेच्या अध्यक्षा सौ. राणीताई कर्डिले यांनी केले, तर अविनाश परांडे यांनी उपस्थितांचे आभार मानले. गुरुपौर्णिमेनिमित्त आयोजित या पुरस्कार सोहळ्याने गुरुजनांविषयीचा आदर, सामाजिक बांधिलकी आणि विविध क्षेत्रातील गुणवंतांच्या कार्याचा गौरव करत उपस्थितांना प्रेरणादायी संदेश दिला. कार्यक्रम उत्साहपूर्ण वातावरणात संपन्न झाला.

**वाचकांच्या लेखणीतून**

## स्वागतार्ह निर्णय पण सर्वंकष सुधारणांची गरज !

**मध्य रेल्वेने स्थानकांवरील कमी उंचीचे फलाट उंच करण्याचा घेतलेला निर्णय निश्चितच स्वागतार्ह आणि प्रवाशांच्या हिताचा आहे. लोकल आणि फलाट यांच्यातील धोकादायक अंतर कमी झाल्यामुळे चढताना-उतरताना होणाऱ्या अपघातांवर काही प्रमाणात आळा बसण्यास मदत होईल. दररोज लाखो प्रवासी लोकलमधून प्रवास करत असताना हा बदल त्यांच्या सुरक्षिततेच्या दृष्टीने अत्यंत महत्त्वाचा ठरणार आहे. विशेषतः ज्येष्ठ नागरिक, दिव्यांग, गर्भवती महिला, लहान मुलांसह प्रवास करणाऱ्या महिला तसेच घाईगडबडीत प्रवास करणाऱ्या प्रवाशांना याचा मोठा फायदा होईल.**

**मात्र, हा निर्णय केवळ सात फलाटांपुरता मर्यादित न राहता ज्या-ज्या स्थानकांवर फलाटांची उंची कमी आहे, त्या सर्व ठिकाणी टप्प्याटप्प्याने ही सुधारणा करण्यात यावी. मुंबई उपनगरीय रेल्वे ही देशातील सर्वाधिक वर्दळीची रेल्वे सेवा असल्याने प्रत्येक स्थानकावर समान दर्जाच्या सुविधा उपलब्ध करून देणे ही काळाची गरज आहे.**

**तसेच, केवळ फलाट उंच करून प्रवाशांच्या सर्व समस्या सुटणार नाहीत. स्थानकांवरील प्रचंड गर्दी, अपुरी स्वच्छता, एस्कलेटर आणि लिफ्टची कमतरता, अपुरे पादचारी पूल, फलाटांवरील अतिक्रमण, वेळेवर न धावणाऱ्या गाड्या आणि वाढत्या प्रवाशांच्या तुलनेत अपुऱ्या फेऱ्या या समस्यांकडेही तितक्याच गांभीर्याने लक्ष देणे आवश्यक आहे. प्रवाशांच्या**



**सुरक्षिततेसाठी सीसीटीव्ही यंत्रणा, योग्य प्रकाशव्यवस्था, स्पष्ट सूचना फलक आणि आपत्कालीन मदत यंत्रणाही अधिक सक्षम करणे गरजेचे आहे.**

**रेल्वे ही मुंबईकरांची जीवनवाहिनी आहे. त्यामुळे रेल्वे प्रशासनाने केवळ अपघातानंतर उपाययोजना करण्याऐवजी भविष्यातील धोके लक्षात घेऊन नियोजनबद्ध आणि दीर्घकालीन पावले उचलली पाहिजेत. प्रवाशांचा प्रवास अधिक सुरक्षित, सुलभ आणि आरामदायी करण्यासाठी पायाभूत सुविधांचा सातत्याने विकास होणे हीच काळाची गरज आहे.**

**स्थानकांवरील फलाट उंच करण्याचा निर्णय हा निश्चितच योग्य दिशेने टाकलेले पाऊल आहे. मात्र, त्यासोबतच प्रवाशांच्या दैनंदिन अडचणी दूर करणाऱ्या इतर उपाययोजनांचीही प्रभावी अंमलबजावणी झाली, तरच मुंबईची लोकल सेवा अधिक सुरक्षित, विश्वासार्ह बनू शकेल.**

**विश्वनाथ पंडित, ठाणे**

# कोयना जलसागराला छत्रपती शिवाजी महाराजांचे नाव

**महायुती सरकारचा निर्णय । मंत्री राधाकृष्ण विखे पाटील यांची माहिती**

**अहिल्यानगर : प्रतिनिधी**

**पश्चिम महाराष्ट्रासाठी जीवनदायिनी ठरलेल्या कोयना जलसागराचे नामकरण आता छत्रपती शिवाजी महाराज कोयना जलसागर असे करण्यात आले आहे. मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या नेतृत्वाखालील महायुती सरकारने हा महत्त्वपूर्ण व ऐतिहासिक निर्णय घेतल्याची माहिती राज्याचे जलसंपदा मंत्री डॉ. राधाकृष्ण विखे पाटील यांनी दिली.**

यापूर्वी कोयना जलसागराचा उल्लेख शिवाजी जलसागर असा केला जात होता. मात्र, छत्रपती शिवाजी महाराजांचा एकेरी उल्लेख योग्य नसल्याने जलसागराला छत्रपती शिवाजी महाराज कोयना जलसागर असे पूर्ण नाव देण्यात यावे, अशी मागणी शिवप्रेमी नागरिकांकडून सातत्याने करण्यात येत होती.



या मागणीची दखल घेत जलसंपदा मंत्री डॉ. राधाकृष्ण विखे पाटील यांनी मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्याकडे जलसागराच्या नामांतराचा प्रस्ताव मांडला होता. त्यानंतर महायुती सरकारने या प्रस्तावास मंजुरी देत शासन आदेश जारी केला असून, कोयना जलसागराचे अधिकृत नामकरण छत्रपती शिवाजी महाराज कोयना जलसागर असे करण्यात आले आहे.

शिवप्रेमी नागरिकांची भावना, जलसंपदा विभागाचा प्रस्ताव आणि ऐतिहासिक वारशाचा सन्मान यांचा सकारात्मक विचार करून मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी हा निर्णय घेतल्याबद्दल जलसंपदा मंत्री डॉ. राधाकृष्ण विखे पाटील यांनी त्यांचे आभार मानले आहेत.

राज्य सरकारच्या या निर्णयाचे शिवप्रेमी, विविध सामाजिक संघटना आणि नागरिकांकडून स्वागत करण्यात येत असून, छत्रपती शिवाजी महाराजांच्या नावाला अधिकृतरीत्या कोयना जलसागराशी जोडण्यात आल्याबद्दल समाधान व्यक्त करण्यात येत आहे.

# दिलीप वळसे पाटील शरद पवारांच्या भेटीला

**गुरुपौर्णिमेचे औचित्य अन् रयत शिक्षण संस्थाचा विषय वळसे पाटलांचे स्पष्टीकरण**

**पुणे : प्रतिनिधी**

**महाराष्ट्राच्या राजकारणात सध्या दोन्ही राष्ट्रवादी काँग्रेस पक्षांचे विलीनीकरण होणार आणि शरद पवार गट केंद्र सरकारला पाठिंबा देऊन एनडीएमध्ये सामील होणार, अशा चर्चांनी प्रचंड जोर धरला आहे. या सर्व घडामोडी चर्चेच्या केंद्रस्थानी असतानाच, अजित पवार गटाचे ज्येष्ठ नेते आणि मंत्री दिलीप वळसे पाटील यांनी बुधवारी पुण्यातील मोदी बाग निवासस्थानी जाऊन शरद पवार यांची भेट घेतली. या हायप्रोफाइल भेटीमुळे राजकीय वर्तुळात अनेक तर्कवितर्क लावले जात आहेत.**



दिलीप वळसे पाटील हे बुधवारी दुपारी शरद पवार यांच्या भेटीसाठी दाखल झाले. आज गुरुपौर्णिमा असल्याने त्यांनी शरद पवारांना पुष्पगुच्छ देऊन त्यांचे आशीर्वाद घेतले. या भेटीनंतर पत्रकारांशी बोलताना दिलीप वळसे पाटील यांनी कोणत्याही राजकीय चर्चेचा दावा फेटाळून लावला.

नेमके काय म्हणाले दिलीप वळसे पाटील?

दिलीप वळसे पाटील म्हणाले, ''आजची भेट ही पूर्णपणे अराजकीय होती. रयत शिक्षण संस्थेच्या काही प्रलंबित प्रश्नांसंदर्भात ही पूर्वनियोजित बैठक आयोजित करण्यात आली होती. या बैठकीला संस्थेचे चेअरमन चंद्रकांत दळवी, व्हाईस चेअरमन भागीरथ शिंदे आणि मी उपस्थित होतो. आज गुरुपौर्णिमा असल्याने पवार साहेबांचे दर्शन घेऊन आशीर्वाद घेतले. यात कुठलीही राजकीय चर्चा झालेली नाही आणि तसा प्रश्नच उद्भवत नाही.''

(पान १ वरून)

## जळगावातील दोन हजार महिलांचा निर्णय

दरम्यान, गेल्या काही महिन्यांपासून या योजनेसाठी केवायसी अनिवार्य करण्यात आली. त्यानंतर अनेक महिलांची नावे लाभार्थी यादीतून वगळण्यात आल्याने विरोधकांनी सरकारवर टीका केली आहे. निवडणुकीसाठीच ही योजना सुरू करण्यात आली होती का, असा सवालही विरोधकांकडून उपस्थित केला जात आहे.

शासनाने एका महिलेला एकाच वेळी एका सामाजिक योजनेचाच लाभ घेता येणार असल्याचे स्पष्ट केले आहे. त्यामुळे संजय गांधी निराधार योजना किंवा अन्य योजनांचा लाभ घेणाऱ्या महिलांना लाडकी बहीण योजनेचा लाभ मिळणार नाही. या धोरणानुसार संबंधित महिलांची नावे लाडकी बहीण योजनेतून वगळली जात आहेत.

याच पार्श्वभूमीवर जळगाव जिल्ह्यातील सुमारे दोन हजार महिलांनी आपण संजय गांधी निराधार योजनेचा लाभ घेत असल्याने लाडकी बहीण योजनेचा लाभ नाकारण्याचा निर्णय घेतला आहे. यासंदर्भातील अर्ज त्यांनी जिल्हा महिला व बाल विकास अधिकाऱ्यांकडे सादर केले आहेत. या निर्णयामुळे लाडकी बहीण योजनेबाबत पुन्हा एकदा चर्चा रंगली असून, अशाच प्रकारे इतर जिल्ह्यांतील लाभार्थीही निर्णय घेणार का, याकडे लक्ष लागले आहे.

## वासुंदे चौकात पिकअपचा भीषण अपघात

या भीषण अपघातात तुषार भगवान भोसले (वय ३०, रा. दुबेर, ता. सिन्नर, जि. नाशिक) यांचा मृत्यू झाला. उपचारापूर्वीच वैद्यकीय अधिकाऱ्यांनी त्यांना मृत घोषित केले. शवविच्छेदनाची प्रक्रिया पूर्ण झाल्यानंतर मृतदेह नातेवाईकांच्या ताब्यात देण्यात आला.

या अपघातात सुनील रामदास बोडके (रा. नाशिक), रवी कैलास शिंदे (रा. शिंदेगाव, जि. नाशिक), रविराज पाटील (रा. कर्नाटक), सोनू इंद्रबहादुर सिंग (रा. उत्तर प्रदेश), राम गंगाराम रच्छा (रा. उत्तर प्रदेश) आणि कांतीलाल प्रभाकर गांगुर्डे (रा. पंचकेश्वर, ता. निफाड, जि. नाशिक) हे गंभीर जखमी झाले आहेत. त्यांच्यावर रुग्णालयात उपचार सुरू असून, डॉक्टरांकडून त्यांच्या प्रकृतीवर बारकाईने लक्ष ठेवण्यात येत आहे.

वाहनावरील नियंत्रण सुटल्याने ही दुर्घटना घडली असावी, असा प्राथमिक अंदाज व्यक्त करण्यात येत असला तरी अपघाताचे नेमके कारण अद्याप स्पष्ट झालेले नाही. वाहनाचा वेग, रस्त्याची परिस्थिती आणि इतर तांत्रिक बाबींची सखोल चौकशी सुरू आहे.

या अपघातप्रकरणी पोलीस निरीक्षक संतोष खेडकर यांच्या मार्गदर्शनाखाली सहाय्यक पोलीस उपनिरीक्षक पोपट रोकडे पुढील तपास करीत आहेत. अपघातामागील नेमके कारण शोधण्यासाठी सर्व बाजूंनी तपास सुरू असल्याची माहिती पोलिसांनी दिली.

## अल्पवयीन मुलीवरील अत्याचारप्रकरणी आरोपीला अटक

सांगितल्यास पीडितेचे फोटो व्हायरल करण्याची आणि तिच्या आई-वडिलांसह भावाला जीवे मारण्याची धमकी दिल्याचाही आरोप तक्रारीत नमूद करण्यात आला आहे.

या तक्रारीवरून पारनेर पोलीस ठाण्यात भारतीय न्याय संहिता कलम ६४(२), ६५(१), ३५१(२) तसेच लैंगिक अपराधांपासून बालकांचे संरक्षण (पोक्सो) कायद्यातील संबंधित कलमांन्वये गुन्हा दाखल करण्यात आला.

गुन्ह्याचे गांभीर्य लक्षात घेऊन पोलीस निरीक्षक संतोष खेडकर यांनी तातडीने गुन्हे शोध पथकाला आरोपीच्या शोधासाठी रवाना केले. गोपनीय माहितीच्या आधारे शोधमोहीम राबवत गुन्हा दाखल झाल्यानंतर अवघ्या एका तासात आरोपीला ताब्यात घेण्यात आले.त्यानंतर न्यायालयात हजर केले असता न्यायालयाने आरोपीला तीन दिवसांची पोलीस कोठडी सुनावली.

ही कारवाई जिल्हा पोलीस अधीक्षक मुम्मक्का सुदर्शन, अपर पोलीस अधीक्षक वैभव कलुबमे, उपविभागीय पोलीस अधिकारी शिरीष वमने यांच्या मार्गदर्शनाखाली पोलीस निरीक्षक संतोष खेडकर, सहाय्यक पोलीस निरीक्षक सोमनाथ दिवटे, पोलीस उपनिरीक्षक चांगदेव हंडाळ तसेच गुन्हे शोध पथकातील अधिकारी व कर्मचाऱ्यांनी केली. या गुन्ह्याचा पुढील तपास पोलीस उपनिरीक्षक चांगदेव हंडाळ करीत आहेत.

## भारतीय क्रिकेटमधील अजिंक्यपर्व संपलं !

कसोटी सामन्यात भारतीय संघाचं प्रतिनिधित्व करताना १४४ डावांत ३८.४६ च्या सरासरीने ५ हजार ७७ धावा काढल्या होत्या. त्यामध्ये १२ शतके आणि २६अर्धशतकांचा समावेश होता. तर १८८ ही त्याची कसोटीमधील सर्वोच्च धावसंख्या होता. त्याबरोबरच क्षेत्ररक्षण करताना त्याने १०२ झेलही टिपले होते. तर ९० एकदिवसीय सामन्यांमध्ये अजिंक्य रहाणेने ३५.,३६ च्या सरासरीने २९०२ धावा काढल्या होत्या. यात ३ शतके आणि २४ अर्धशतकांचा समावेश होता. याशिवाय २० टी-२० सामन्यांत २०.८३ च्या सरासरीने ३७५ धावा काढल्या होत्या. त्यात एका अर्धशतकाचा समावेश होता.

अशी होती रहाणेची आयपीएलमधील कारकीर्द

अजिंक्य रहाणेची ओळख तंत्रशुद्ध आणि संयमी फलंदाज अशी असली तरी गेल्या काही वर्षांत आयपीएलमध्ये त्याने अनेकवेळा विस्फोटक फलंदाजी करून दाखवली होती. अजिंक्य रहाणेने आयपीएलमध्ये मुंबई इंडियन्स, राजस्थान रॉयल्स, रायझिंग पुणे सुपरजायंट्स, दिल्ली कॅपिटल्स, कोलकाता नाईटरायडर्स आणि चेन्नई सुपरकिंग्स या सहा संघांकडून २१२ सामने खेळले. त्यात त्याने ३०.१५ च्या सरासरीने ५ हजार ३६७ धावा काढल्या. यामध्ये २ शतके आणि ३५ अर्धशतकांचा समावेश होता.

# गुरु वंदना, समाज वंदना !

## अळकुटी ग्रामीण पतसंस्थेचा १७५ शिक्षक, सेवानिवृत्त शिक्षक व अंगणवाडी सेविकांना मानाचा मुजरा । चेअरमन महेश शिरोळे यांच्या कार्याचे सर्वत्र कौतुक

अळकुटी : प्रतिनिधी
गुरुपौर्णिमेचे औचित्य आणि क्रांतीसूर्य महात्मा ज्योतिराव फुले यांच्या २०० व्या जन्मशताब्दी वर्षाचे औचित्य साधत अळकुटी ग्रामीण सहकारी पतसंस्थेच्या वतीने शैक्षणिक क्षेत्रात उल्लेखनीय योगदान देणाऱ्या शिक्षक, सेवानिवृत्त शिक्षक आणि अंगणवाडी सेविकांचा भव्य सत्कार सोहळा अळकुटी येथील कृष्णा टाऊन सभागृहात उत्साहात पार पडला. या वेळी १७५ हून अधिक मान्यवरांना शाल, सन्मानचिन्ह आणि पुष्पगुच्छ देऊन गौरविण्यात आले.



### शिक्षणसेवकांना कृतज्ञतेची मानवंदना
समाजघडणीत मोलाचे योगदान देणाऱ्या गुरुजनांप्रती कृतज्ञता व्यक्त करण्याच्या उद्देशाने आयोजित करण्यात आलेल्या या कार्यक्रमास पुणे जिल्हा परिषदेचे माजी सदस्य प्रसन्ना डोके यांच्यासह अळकुटी पंचक्रोशीतील मान्यवर, विविध संस्थांचे पदाधिकारी, ग्रामस्थ आणि महिला मोठ्या संख्येने उपस्थित होते. शिक्षक आणि अंगणवाडी सेविकांच्या पाद्यपूजेसह त्यांचा सन्मान करण्यात आल्याने कार्यक्रमाला विशेष भावनिक स्वरूप प्राप्त झाले.

### महेश शिरोळे यांच्या सामाजिक कार्याचे कौतुक
अळकुटी ग्रामीण सहकारी पतसंस्थेचे चेअरमन महेश शिरोळे आणि त्यांच्या सहकाऱ्यांनी गेल्या अनेक वर्षांपासून सामाजिक, शैक्षणिक, ऐतिहासिक आणि धार्मिक उपक्रम सातत्याने राबवत पतसंस्थेचा लौकिक वाढविला आहे. संस्था स्थापनेपासून सर्वसामान्यांना आर्थिक आधार देतानाच समाजहिताचे विविध उपक्रम हाती घेतल्याने त्यांच्या कार्याचे ग्रामस्थांकडून विशेष कौतुक करण्यात आले.

### गुरुजनांचा सन्मान म्हणजे समाजाला दिशा
यावेळी बोलताना प्रसन्ना डोके यांनी महेश शिरोळे आणि त्यांच्या सहकाऱ्यांचे अभिनंदन करताना सांगितले की, गुरुपौर्णिमेच्या निमित्ताने गुरुजन आणि अंगणवाडी सेविकांचा सन्मान करून त्यांनी समाजापुढे आदर्श निर्माण केला आहे. महात्मा फुले यांच्या विचारांचे केवळ स्मरण न करता ते आचरणात आणण्याची गरज असून, हा उपक्रम नव्या पिढीसाठी प्रेरणादायी आणि अनुकरणीय असल्याचे त्यांनी नमूद केले.

### अभ्यासिका आणि वृक्षारोपणाचा संकल्प
पतसंस्थेचे चेअरमन महेश शिरोळे यांनी भविष्यात युवकांसाठी विविध मार्गदर्शन कार्यशाळा आयोजित करण्याचा मानस व्यक्त केला. शासनाच्या पाठपुराव्यातून अळकुटी येथे एमपीएससी अभ्यासिका उभारण्याचे ध्येय असल्याचे त्यांनी सांगितले. तसेच, कोरोनाकाळात निधन झालेल्या नागरिकांच्या स्मृतिप्रीत्यर्थ एक झाड गावासाठी, आई-वडिलांच्या नावासाठी या संकल्पनेतून लोकसहभागाने गायरान क्षेत्रात मोठ्या प्रमाणावर वृक्षारोपण मोहीम राबविण्यात येणार असल्याची घोषणाही त्यांनी केली. संबंधित कुटुंबीयांनी या उपक्रमात सहभागी व्हावे, असे आवाहनही त्यांनी केले.

### मान्यवरांची उपस्थिती
या कार्यक्रमास बाजार समितीचे माजी सभापती कुंदनकाका साखला, माजी पंचायत समिती सदस्य डॉ. भास्करराव शिरोळे, संजयदादा ठुबे, उपसरपंच बाळासाहेब धोत्रे, माजी उपसरपंच अरिफ पटेल, शरद घोलप, पतसंस्थेचे उपाध्यक्ष नवनाथ शिरोळे, ज्येष्ठ संचालक संपतराव शिरोळे, मधुकरराव जाधव, बाळासाहेब भंडारी, प्रफुल्ल शिरोळे, बाळकृष्ण परंडवाल, संजय मते, किरण शिंदे, नुरमोहम्मद कुरेशी, आशपाक मोमीन, मंगेश पारखे, गोरख घोलप यांच्यासह पंचक्रोशीतील विविध संस्थांचे पदाधिकारी, ग्रामस्थ आणि महिला मोठ्या संख्येने उपस्थित होते. कार्यक्रमाचे सूत्रसंचालन प्रसिद्ध निवेदक उत्तम घोलप यांनी केले, तर पतसंस्थेचे व्यवस्थापक सुरेश घोलप यांनी आभार मानले. कार्यक्रमाच्या यशस्वी आयोजनासाठी पतसंस्थेचे संचालक मंडळ, सभासद, अधिकारी, कर्मचारी आणि महेश शिरोळे मित्रमंडळ यांनी विशेष परिश्रम घेतले.

# लोहार समाज संस्थेच्या जिल्हाध्यक्षपदी भास्कर पोपळघट

## तरुणांना मुख्य प्रवाहात आणण्यासाठी संघटना अधिक सक्षम करणार

कान्हुर पठार : प्रतिनिधी
अखिल लोहार समाज विकास संस्था, महाराष्ट्र राज्य प्रतिनिधी समितीची बैठक नुकतीच पुणे येथे राज्याध्यक्ष संदीप थोरात यांच्या अध्यक्षतेखाली उत्साहपूर्ण वातावरणात पार पडली. या बैठकीत लोहार समाजाच्या संघटनात्मक विस्ताराला गती देण्यासाठी महत्त्वपूर्ण निर्णय घेण्यात आले. यावेळी संस्थेच्या अहिल्यानगर जिल्हाध्यक्षपदी भास्कर पोपळघट यांची एकमताने निवड करण्यात आली. त्यांच्या निवडीमुळे जिल्ह्यातील लोहार समाजाच्या संघटनात्मक कार्याला नवी दिशा मिळणार असल्याची भावना उपस्थितांनी व्यक्त केली.



### राज्यभर संघटन विस्तारावर भर
बैठकीला राज्य संघटनेचे उपाध्यक्ष विश्वनाथ लोखंडे, सचिव डॉ. मुकुंद लोखंडे, मनोज थोरात, खजिनदार निवृत्ती पोपळघट, पुणे जिल्हाध्यक्ष भरत थोरात, संस्थापक सदस्य नवनाथ हराळे, बाळासाहेब इघे, सुभेदार किसनराव पखाले, उद्योजक बाळासाहेब चव्हाण, किसनराव लोखंडे, दत्ताभाऊ जगताप, विजयकुमार जगताप, गुलाब चव्हाण, प्रसिद्धीप्रमुख रोहिणीताई हराळे यांच्यासह राज्यभरातील पदाधिकारी व समाजबांधव मोठ्या संख्येने उपस्थित होते.

### तरुणांना मुख्य प्रवाहात आणण्यासाठी प्रयत्न
यावेळी मार्गदर्शन करताना राज्याध्यक्ष संदीप थोरात यांनी सांगितले की, राज्यातील लोहार समाजाची सामाजिक व आर्थिक परिस्थिती चिंताजनक असून समाजातील तरुणांना शिक्षण, रोजगार व उद्योगाच्या माध्यमातून मुख्य प्रवाहात आणण्यासाठी संस्था सातत्याने प्रयत्नशील आहे. शासनाच्या विविध योजना समाजाच्या शेवटच्या घटकापर्यंत पोहोचाव्यात, यासाठी शासन दरबारी सातत्याने पाठपुरावा केला जात आहे. अहिल्यानगर जिल्ह्यात भास्कर पोपळघट यांच्या नेतृत्वाखाली जिल्हा कार्यकारिणी जाहीर करून प्रत्येक तालुक्यात संघटनेची उभारणी करण्यात येणार असून समाजातील युवकांना एकत्रित करून सक्षम व प्रभावी संघटना उभी करण्याचा निर्धारही त्यांनी व्यक्त केला.

### विश्वकर्मा औद्योगिक सोसायटीचा संकल्प
नवनियुक्त जिल्हाध्यक्ष भास्कर पोपळघट यांनी समाजाच्या आर्थिक उन्नतीसाठी ठोस पावले उचलण्याचा निर्धार व्यक्त केला. सुपा एमआयडीसीमध्ये जागेची मागणी करून लोहार समाजातील युवकांसाठी विश्वकर्मा औद्योगिक सोसायटी स्थापन करण्यासाठी प्रयत्न करण्यात येणार असल्याचे त्यांनी सांगितले. तसेच तालुकानिहाय समित्या स्थापन करून रोजगार, उद्योग व कौशल्यविकासाच्या माध्यमातून युवकांना सक्षम करण्यावर भर दिला जाणार असल्याचे त्यांनी स्पष्ट केले.

### महामंडळाचा लाभ प्रत्यक्षात मिळावा
महाराष्ट्र शासनाने लोहार समाजाच्या सामाजिक व आर्थिक उन्नतीसाठी ब्रह्मलीन आचार्य दिव्यानंद महाराज आर्थिक विकास महामंडळ स्थापन केले. या महामंडळाच्या माध्यमातून सुशिक्षित युवकांना उद्योगासाठी कर्ज उपलब्ध होईल, अशी अपेक्षा होती. मात्र बँकांच्या विविध अटी व शर्तींमुळे अनेक युवकांना कर्ज मिळत नसल्याने या योजनेचा अपेक्षित लाभ समाजापर्यंत पोहोचत नसल्याची खंत व्यक्त करण्यात आली. त्यामुळे शासनाकडे सातत्याने पाठपुरावा करून युवकांना सुलभ कर्ज उपलब्ध करून देण्यासाठी संघटना प्रयत्न करणार असल्याचे पोपळघट यांनी सांगितले.

### समाजभवन उभारणीसाठीही पाठपुरावा
कार्याध्यक्ष नवनाथ हराळे यांनी सांगितले की, सन २००२ मध्ये तत्कालीन मुख्यमंत्री विलासराव देशमुख यांच्या उपस्थितीत अहिल्यानगर येथे राज्यस्तरीय अधिवेशन झाले होते. स्वर्गीय साथी हौशिनाथ पोपळघट यांच्या पुढाकारामुळे समाजाच्या विविध मागण्या मंजूर झाल्या आणि लोहार समाजाचा एन.टी.-बी प्रवर्गात समावेश झाल्याने अनेक विद्यार्थ्यांना शैक्षणिक लाभ मिळाला. मात्र त्यानंतर संघटनात्मक कामकाजात काहीशी मरगळ आली. इतर बलुतेदार समाजांची समाजभवने उभी राहिली असताना लोहार समाज या बाबतीत मागे राहिला आहे. त्यामुळे आगामी काळात अहिल्यानगर येथे भव्य समाजभवन उभारण्यासाठी संघटनेमार्फत प्रभावी पाठपुरावा करण्यात येणार असल्याचे त्यांनी स्पष्ट केले.

# गुरुपौर्णिमेनिमित्त गुरुजनांना कृतज्ञतेचा मान

## न्यू इंग्लिश स्कूलमध्ये स्व. ग. रा. म्हस्के यांना भावपूर्ण अभिवादन



पारनेर : प्रतिनिधी
न्यू इंग्लिश स्कूल, पारनेर येथे गुरुपौर्णिमा आणि संस्थेचे भूतपूर्व सचिव स्वर्गीय ग. रा. म्हस्के यांच्या पुण्यतिथीनिमित्त आयोजित कार्यक्रम उत्साहपूर्ण आणि भावनिक वातावरणात पार पडला. विद्यार्थ्यांनी गुरुजनांप्रती कृतज्ञता व्यक्त करत शिक्षकांचा सन्मान केला, तर स्व. म्हस्के यांच्या शैक्षणिक कार्याला उजाळा देत त्यांना विनम्र अभिवादन करण्यात आले.

### गुरुजनांचा गुलाबपुष्प देऊन सन्मान
गुरुपौर्णिमेचे औचित्य साधत विद्यार्थ्यांनी विद्यालयातील सर्व शिक्षक बंधू-भगिनींना गुलाबपुष्प अर्पण करून त्यांचा सन्मान केला. गुरुंच्या मार्गदर्शनामुळेच विद्यार्थ्यांच्या जीवनाला योग्य दिशा मिळते, हा संदेश या उपक्रमातून देण्यात आला.

### दीपप्रज्वलनाने कार्यक्रमाची सुरुवात
कार्यक्रमाची सुरुवात आद्यगुरू महर्षी व्यास तसेच स्वर्गीय ग. रा. म्हस्के यांच्या प्रतिमेला पुष्पहार अर्पण करून व दीपप्रज्वलनाने करण्यात आली. यावेळी उपस्थितांनी ज्ञानपरंपरेचे स्मरण करत गुरुजनांविषयी आदरभाव व्यक्त केला.

### विद्यार्थ्यांनी उलगडले गुरुपौर्णिमेचे महत्त्व
मल्हार कुलकर्णी आणि विभावरी करपे यांनी आपल्या मनोगतातून गुरुपौर्णिमेचे धार्मिक, सांस्कृतिक आणि शैक्षणिक महत्त्व अधोरेखित केले. जीवनातील प्रत्येक यशामागे गुरुंचे मार्गदर्शन आणि संस्कार असतात, असे विचार त्यांनी प्रभावीपणे मांडले.

### स्व.म्हस्के यांच्या कार्याला उजाळा
विद्यालयाचे प्राचार्य के. बी. शिंदे यांनी गुरुपौर्णिमेच्या शुभेच्छा देताना संस्थेचे भूतपूर्व सचिव स्व. ग. रा. म्हस्के यांच्या पुण्यतिथीनिमित्त त्यांच्या कार्याचा गौरवपूर्ण आढावा घेतला. संस्थेच्या उभारणीसह शैक्षणिक विकासासाठी त्यांनी दिलेले योगदान आजही प्रेरणादायी असल्याचे सांगत त्यांना विनम्र अभिवादन करण्यात आले.

### आठवीच्या विद्यार्थ्यांचे नियोजन
या कार्यक्रमाचे संपूर्ण नियोजन आणि परिपाठ सादरीकरण इयत्ता आठवी अच्या विद्यार्थ्यांनी अत्यंत शिस्तबद्ध आणि प्रभावीपणे पार पाडले. कार्यक्रमाचे सूत्रसंचालन भक्ती अंबुले आणि सानिका देशमाने यांनी केले. कार्यक्रमाच्या यशस्वी आयोजनासाठी वर्गशिक्षिका श्रीमती सालके यांचे मार्गदर्शन लाभले. विद्यालयाचे पर्यवेक्षक अजित के. दिवटे, सर्व शिक्षकवृंद तसेच विद्यार्थी मोठ्या संख्येने उपस्थित होते. गुरुजनांप्रती कृतज्ञता, संस्कार आणि संस्थेच्या कार्यकर्त्यांप्रती आदर व्यक्त करणारा हा कार्यक्रम सर्वांच्या स्मरणात राहील, अशी भावना उपस्थितांनी व्यक्त केली.

# नारायणगव्हाणच्या लेकीची आंतरराष्ट्रीय भरारी

## मानसी बोरुडेचा शिक्षण मंत्र्यांच्या हस्ते गौरव

नारायणगव्हाण : प्रतिनिधी
तालुक्यातील नारायणगव्हाण येथील मानसी चंद्रकांत बोरुडे हिने रशियामधून एमबीबीएस हा वैद्यकीय पदवी अभ्यासक्रम यशस्वीपणे पूर्ण करून आपल्या गावाचे, तालुक्याचे आणि कुटुंबाचे नाव उज्ज्वल केले आहे. तिच्या या उल्लेखनीय शैक्षणिक यशाची दखल घेत राज्याचे उच्च व तंत्र शिक्षण मंत्री चंद्रकांत पाटील यांच्या हस्ते तिचा पुष्पगुच्छ देऊन सन्मान करण्यात आला. यावेळी तिच्या पुढील वैद्यकीय कारकिर्दीसाठी शुभेच्छाही देण्यात आल्या.



### वैद्यकीय यशाचा राज्यस्तरीय गौरव
परदेशात जाऊन वैद्यकीय शिक्षण पूर्ण करणे हे प्रत्येक विद्यार्थ्यासाठी मोठे आव्हान मानले जाते. कठोर परिश्रम, सातत्य आणि जिद्दीच्या बळावर मानसी बोरुडे हिने रशियातून एमबीबीएस पदवी संपादन करत उल्लेखनीय यश मिळविले. तिच्या या यशामुळे तिचा विशेष सन्मान करण्यात आला. मंत्री चंद्रकांत पाटील यांनी तिचे अभिनंदन करत भविष्यात रुग्णसेवेच्या माध्यमातून समाजासाठी मोलाचे योगदान द्यावे, अशी अपेक्षा व्यक्त केली.

### नारायणगव्हाणच्या शिरपेचात मानाचा तुरा
मानसी बोरुडे ही नारायणगव्हाणचे माजी सरपंच, पारनेर ग्रामीण पतसंस्थेचे उपाध्यक्ष तसेच भैरवनाथ देवस्थान, जातेगावचे उपाध्यक्ष सुरेश बोऱ्हुडे यांची पुतणी आहे. कुटुंबाच्या पाठबळासह तिने शिक्षणात सातत्य राखत हे यश संपादन केल्याने बोरुडे कुटुंबासह संपूर्ण नारायणगव्हाण गावात आनंदाचे वातावरण निर्माण झाले आहे.

### ग्रामीण विद्यार्थ्यांसाठी प्रेरणादायी
ग्रामीण भागातून शिक्षण घेत जागतिक स्तरावर वैद्यकीय शिक्षण पूर्ण करणे ही निश्चितच अभिमानाची बाब आहे. मर्यादित साधनसामग्री असतानाही जिद्द आणि मेहनतीच्या जोरावर मोठे ध्येय गाठता येते, याचे जिवंत उदाहरण मानसी बोऱ्हुडे हिने घालून दिले आहे. तिच्या या यशामुळे अनेक विद्यार्थ्यांना वैद्यकीय क्षेत्रात करिअर करण्याची प्रेरणा मिळणार असल्याची भावना उपस्थितांनी व्यक्त केली.

### सर्व स्तरांतून अभिनंदन
मानसीच्या यशाबद्दल गावातील ग्रामस्थ, नातेवाईक, मित्रपरिवार, विविध सामाजिक संस्थांचे पदाधिकारी तसेच शिक्षण क्षेत्रातील मान्यवरांनी तिच्यावर अभिनंदनाचा वर्षाव केला. तिच्या भावी वाटचालीसाठी शुभेच्छा देत समाजसेवेच्या माध्यमातून ती अधिक उंच भरारी घेईल, असा विश्वास व्यक्त करण्यात आला.

# राळेगणसिद्धीच्या ग्रामस्थांची गुरुपौर्णिमेला पंढरपूर वारी

## ५० भाविकांना लाभले विठ्ठल-रखुमाई दर्शन । संत निळोबा महाराजांच्या पादुकांच्या विठ्ठल भेटीने भक्तिमय वातावरण

राळेगणसिद्धी : प्रतिनिधी
गुरुपौर्णिमेनिमित्त राळेगणसिद्धी येथील सुमारे ५० ग्रामस्थांनी विशेष एसटी बसने पंढरपूर येथे जाऊन श्री विठ्ठल-रखुमाईचे दर्शन घेतले. यावेळी महाराष्ट्राचे अखेरचे संत म्हणून ओळखले जाणारे संत निळोबा महाराज यांच्या पादुकांची श्री विठ्ठलाशी होणारी पारंपरिक भेट पाहण्याचा दुर्मिळ योग लाभल्याने भाविकांच्या भक्तिभावाला वेगळेच उधाण आले.



### भक्तिरसात न्हालेली पंढरी
गुरुपौर्णिमेनिमित्त पंढरपूर नगरीत हजारो वारकरी आणि भाविकांची मोठी गर्दी झाली होती. विठ्ठल नामाच्या अखंड गजराने आणि टाळ-मृदंगाच्या निनादाने संपूर्ण पंढरी भक्तिमय वातावरणात न्हाऊन निघाली होती. अशा मंगलमय वातावरणात राळेगणसिद्धीच्या ग्रामस्थांनी श्री विठ्ठल-रखुमाईच्या चरणी नतमस्तक होत दर्शनाचा लाभ घेतला.

### निळोबांच्या पादुकांच्या भेटीचा दुर्मिळ योग
दर्शनानंतर ग्रामस्थांनी संत निळोबा महाराजांच्या पादुकांची श्री विठ्ठलाशी होणारी पारंपरिक भेट अनुभवली. वारकरी संप्रदायातील श्रद्धा, भक्ती आणि संतपरंपरेचे दर्शन घडविणारा हा सोहळा पाहताना अनेक भाविक भारावून गेले. संतांच्या चरणांप्रती असलेली नितांत श्रद्धा आणि विठ्ठलभक्तीचा अनोखा संगम यावेळी अनुभवायला मिळाला.

### सुख-समृद्धीसाठी प्रार्थना
श्री विठ्ठल-रखुमाईच्या दर्शनानंतर ग्रामस्थांनी राज्यात सुख, शांती आणि समृद्धी नांदावी, सर्वांना निरोगी आयुष्य लाभावे तसेच यंदा चांगला पाऊस होऊन शेतकरी सुखी व्हावा, अशी मनोभावे प्रार्थना केली. गुरुपौर्णिमेच्या निमित्ताने झालेल्या या भक्तिमय यात्रेमुळे आध्यात्मिक समाधान लाभल्याची भावना ग्रामस्थांनी व्यक्त केली.

### ग्रामस्थांचे मोलाचे सहकार्य
या दर्शन सोहळ्याचे नियोजन यशस्वी करण्यासाठी गणेश हजारे, एकनाथ पठारे, दादाभाऊ फटांगडे, मारुती पठारे, विठ्ठल पठारे आणि अर्जुन पठारे यांनी विशेष परिश्रम घेतले. तसेच ग्रामस्थांच्या पंढरपूर प्रवासाचे नियोजन एकनाथ पोटे, सुभाष गाजरे, आदिनाथ पठारे, मंगेश मापारी, नंदकुमार मापारी आणि सुनिल हजारे यांनी केले. सर्वांच्या समन्वयामुळे विठ्ठल-रखुमाईचे दर्शन शांततेत, शिस्तबद्ध आणि सुरळीतपणे पार पडल्याची भावना उपस्थितांनी व्यक्त केली.

# गुरुभक्तीच्या साक्षीने शिष्यगण मेळावा

## टाकळी ढोकेश्वरमध्ये गुरुपौर्णिमा भक्तिमय वातावरणात संपन्न

टाकळी ढोकेश्वर : प्रतिनिधी
तालुक्यातील टाकळी ढोकेश्वर येथील बांडे मळ्यात श्री भैरवनाथ मंदिर परिसरात रामदास भाऊसाहेब बांडे शिष्य मंडळाच्या वतीने आयोजित करण्यात आलेला गुरुपौर्णिमा उत्सव व शिष्यगण मेळावा मोठ्या भक्तिभावात आणि उत्साहपूर्ण वातावरणात संपन्न झाला. विविध धार्मिक, सामाजिक आणि सांस्कृतिक कार्यक्रमांनी नटलेल्या या मेळाव्याने गुरु-शिष्य परंपरेचा जागर केला. मान्यवरांच्या उपस्थितीमुळे कार्यक्रमाला विशेष उंची लाभली.




### मान्यवरांची उपस्थिती
कार्यक्रमाला खासदार नीलेश लंके यांच्या पत्नी तथा माजी जिल्हा परिषद सदस्य राणीताई लंके, बाजार समितीचे संचालक अशोक कटारिया, खरेदी-विक्री संघाचे माजी चेअरमन बाबासाहेब खिलारी, कौन्सिलिंग सदस्य डॉ. भाऊसाहेब खिलारी, माजी सरपंच सुनीता झावरे, चेअरमन नारायणराव झावरे, राष्ट्रवादी काँग्रेसचे जिल्हा प्रवक्ते मोहन रोकडे, अमोल उगले आणि भालेराव गुरुजी यांची प्रमुख उपस्थिती होती.

### भजन व प्रवचनाने भाविक मंत्रमुग्ध
सकाळी साडेनऊ ते साडेदहा या वेळेत शाहीर अण्णासाहेब चौरे, शाहीर शांताराम किनकर आणि संगीत रत्न भाऊसाहेब आंधळे यांनी सादर केलेल्या भक्तिमय भजनांनी मंदिर परिसर भक्तिरसाने भारावून गेला. त्यानंतर वडगाव सावताळ येथील ह.भ.प. गोरक्षनाथ महाराज रोकडे यांनी केलेल्या ओजस्वी आणि विचारप्रवर्तक प्रवचनातून गुरुसेवा, अध्यात्म आणि संस्कारांचे महत्त्व उपस्थितांना पटवून दिले.

### जागरण-गोंधळाने रंगला धार्मिक सोहळा
दुपारी एक वाजता साकर ठाणगे तसेच श्री. बाळासाहेब निवडुंगे आणि त्यांच्या सहकाऱ्यांनी पारंपरिक जागरण-गोंधळ सादर केला. पारंपरिक वाद्यांच्या गजरात आणि भक्तिमय सादरीकरणामुळे उपस्थितांनी उत्स्फूर्त दाद देत धार्मिक सोहळ्याचा आनंद लुटला.

### गरजूंना वस्त्रवाटप
गुरुपौर्णिमेच्या औचित्याने राणीताई लंके यांच्या हस्ते अनेक गरजवंतांना वस्त्रांचे वाटप करण्यात आले. या सामाजिक उपक्रमाचे उपस्थितांनी स्वागत करत आयोजकांच्या सेवाभावी कार्याचे कौतुक केले. धार्मिक उत्सवासोबत समाजोपयोगी उपक्रम राबविण्याचा संदेशही यावेळी देण्यात आला.

### महाप्रसादाचे आयोजन
कार्यक्रमानंतर उपस्थित भाविकांसाठी महाप्रसादाची व्यवस्था करण्यात आली होती. या महाप्रसादासाठी अशोक गंगाराम चव्हाण, महेश धोंडीराम सर्वन (त्र्यंबकेश्वर), जालिंदर प्रभाकर वाबळे आणि महेश रामदास बांडे यांनी अन्नदानाचे पुण्यकार्य केले. भाविकांनी महाप्रसादाचा लाभ घेत आयोजकांविषयी कृतज्ञता व्यक्त केली.

### गुरु-शिष्य परंपरेला नवी ऊर्जा
या मेळाव्यासाठी पत्रकार, सरपंच, उपसरपंच, विविध संस्थांचे पदाधिकारी, संचालक मंडळ, भैरवनाथ मित्र मंडळ, बनाई मित्र मंडळ, नवभारत मित्र मंडळ, समस्त बांडे परिवार, टाकळी ढोकेश्वर ग्रामस्थ तसेच मोठ्या संख्येने शिष्यगण उपस्थित होते. कार्यक्रमाच्या यशस्वी आयोजनाबद्दल श्री रामदास बांडे महाराज यांनी सर्व उपस्थितांचे मनःपूर्वक आभार मानले. गुरुपौर्णिमा उत्सव आणि शिष्यगण मेळाव्याच्या माध्यमातून अध्यात्म, सामाजिक बांधिलकी आणि गुरु-शिष्य परंपरेचे जतन करण्याचा संदेश देत हा सोहळा भक्तिमय वातावरणात संपन्न झाला.

# ४० वृक्षांच्या साक्षीने सुवर्ण महोत्सवी वर्षाचे स्वागत

## पारनेर महाविद्यालयाचा अभिनव उपक्रम । केवळ वृक्षारोपण नव्हे, तर वृक्षसंवर्धनचा संदेश

पारनेर : प्रतिनिधी
पारनेर येथील न्यू आर्ट्स, कॉमर्स अँड सायन्स महाविद्यालयाच्या सुवर्ण महोत्सवी वर्षाचा प्रारंभ पर्यावरण संवर्धनाचा संदेश देणाऱ्या वृक्षारोपण उपक्रमाने उत्साहात करण्यात आला. केवळ वृक्षारोपण नव्हे, तर वृक्षसंवर्धन हा संदेश देत महाविद्यालय परिसरात विविध जातींच्या तब्बल ४० पारंपरिक व पर्यावरणपूरक वृक्षांची लागवड करण्यात आली. या उपक्रमातून विद्यार्थ्यांमध्ये पर्यावरण संरक्षणाची जाणीव निर्माण करण्याबरोबरच निसर्गाशी नाते अधिक दृढ करण्याचा प्रयत्न करण्यात आला.



### एनएसएस-एनसीसी विद्यार्थ्यांचा सहभाग
महाविद्यालयातील राष्ट्रीय सेवा योजना (एनएसएस) आणि राष्ट्रीय छात्र सेना (एनसीसी) विभागाच्या विद्यार्थ्यांनी या हरित मोहिमेत उत्स्फूर्त सहभाग घेतला. विद्यार्थ्यांनी प्रत्यक्ष वृक्षारोपण करत पर्यावरण संवर्धनाची जबाबदारी स्वीकारण्याचा संकल्प केला. या मोहिमेत कडुनिंब, करंजी, बहावा, कदंब, सिल्व्हर ओक यांसारख्या छायादायी व औषधी वनस्पतींसह वड आणि पिंपळ यांसारख्या दीर्घायुषी पारंपरिक वृक्षांची लागवड करण्यात आली.

### झाड लावणे नव्हे, ते जगविणे महत्त्वाचे
यावेळी प्राचार्य डॉ. रंगनाथ आहेर यांनी विद्यार्थ्यांना मार्गदर्शन करताना वृक्षसंवर्धनाचे महत्त्व अधोरेखित केले. केवळ एका दिवशी झाड लावून कर्तव्य संपत नाही. प्रत्येक रोपाची सातत्याने काळजी घेतली, तरच वृक्षसंवर्धनाचा उद्देश साध्य होईल. बदलते हवामान, बिघडलेले पर्जन्यचक्र आणि वाढते प्रदूषण यावर मात करण्यासाठी वृक्षारोपण आणि त्याचे जतन हा एकमेव प्रभावी पर्याय आहे. आज लावलेली पारंपरिक झाडे भविष्यात शुद्ध हवा, शीतल सावली आणि निरामय आरोग्य देतील, असे त्यांनी सांगितले. या उपक्रमातून प्रेरणा घेऊन विद्यार्थी आपल्या परिसरातही वृक्ष लागवड करून ती जगवतील, असा विश्वास त्यांनी व्यक्त केला.

### प्राध्यापकांचा सहभाग
सुवर्ण महोत्सवी वर्षाच्या प्रारंभी झालेल्या या उपक्रमात उपप्राचार्य डॉ. तुकाराम थोपटे, अंतर्गत गुणवत्ता सिद्धता कक्ष (आयक्यूएसी) समन्वयक डॉ. दत्तात्रय घुंगार्डे, प्रा. डॉ. दिलीप ठुबे, विद्यार्थी विकास अधिकारी डॉ. हरेश शेळके, राष्ट्रीय सेवा योजना अधिकारी डॉ. प्रकाश गावित, प्रा. नितीन निपुंगे, डॉ. माया लहारे तसेच एनसीसीचे कॅप्टन प्रा. भरत डगळे यांनी प्रत्यक्ष खड्डे खोदून रोपे लावत विद्यार्थ्यांसमवेत सहभाग नोंदवला.

### सुवर्ण महोत्सवी वर्षाची हरित सुरुवात
महाविद्यालयाच्या सुवर्ण महोत्सवी वर्षाची सुरुवात पर्यावरणपूरक उपक्रमाने झाल्याने या वर्षभरात सामाजिक, शैक्षणिक आणि पर्यावरणविषयक विविध उपक्रमांची मालिका राबविण्यात येणार असल्याची भावना उपस्थितांनी व्यक्त केली. वृक्षारोपणासह वृक्षसंवर्धनाचा संकल्प करून विद्यार्थ्यांनी पर्यावरण रक्षणाची सामूहिक जबाबदारी स्वीकारत सुवर्ण महोत्सवी वर्षाची संस्मरणीय सुरुवात केली.

'पारनेर दर्शन' हे पत्रक मुद्रक,प्रकाशक व मालक देविदास रामभाऊ आबूज यांनी ओंकार ऑफसेट, कॉलेज रोड, पारनेर ४१४३०२ अहमदनगर (महाराष्ट्र) येथे छापून 'पारनेर दर्शन' कार्यालय, कॉलेज रोड,पारनेर ४१४३०२,जि.अहमदनगर (महाराष्ट्र) येथून प्रसिद्ध केले. संपादक : देविदास रामभाऊ आबूज मोबा.९४२१४७८२८३ ई- मेल : deviabuj@gmail.com
'PARNER DARSHAN' Printer,Publisher And Ower By DEVIDAS RAMBHAU ABUJ Printed At OMKAR OFSSET Collage Road,PARNER-414302 Dist-Ahmednagar (M.S)
Editor-DEVIDAS RAMBHAU ABUJ ▪ Mob : 9421478283 ▪ Email : deviabuj@gmail.com